बिसेन डेन्टल केअर
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)
दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)
ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०

साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे



गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध

आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१५ गोंदिया | अंक ०४ | बुधवार, दि.३१ डिसेंबर २०२५ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/104/2025-2027

## शाळेच्या प्रवेशद्वारासमोर विद्यार्थी-पालकांचा ठिय्या

### शहीद जान्या तिम्या हायस्कूल; मुख्याध्यापकाला हटविण्याची मागणी

**गोरेगाव** : येथील शहीद जान्या तिम्या जिल्हा परिषद हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाचे मुख्याध्यापक प्रभाकर लोंढे यांच्या कार्यप्रणालीवर ठपका ठेवत विद्यार्थी व त्यांच्या पालकांनी मंगळवारी (ता. ३०) सकाळी नऊ वाजेपासून शाळेच्या प्रवेशद्वारासमोर ठिय्या मांडला. यावेळी आंदोलकांनी मुख्याध्यापकाची ताबडतोब बदली करण्यात यावी, अशी मागणी केली.



विद्यार्थी व पालकांनी शाळेच्या प्रवेशद्वारासमोर सकाळी नऊ वाजेपासून ठिय्या आंदोलनाला सुरवात केली. मुख्याध्यापक प्रभाकर लोंढे यांची इतरत्र बदली करण्यात यावी, अशी मागणी रेटून धरली. इतकेच नव्हे, तर मुख्याध्यापक प्रभाकर लोंढे यांच्याविरोधात घोषणा देत मागणी पूर्ण झालीच पाहिजे, अन्यथा विद्यार्थी व पालक शाळेत पाऊलही ठेवणार नाही. अशा घोषणा देण्यात आल्या. तथापि, परिस्थिती हाताबाहेर जाण्याची शक्यता निर्माण झाल्याने संबंधित अधिका?्यांची धावपळ सुरु झाली. वरिष्ठ अधिकारी घटनास्थळी पोहोचले.

मुख्य कार्यकारी अधिकारी एम. मुरगानंथम यांच्यासह जिल्हा परिषद अध्यक्ष लायकराम भेंडारकर, जिल्हा परिषद उपाध्यक्ष सुरेश हर्षे, शिक्षण समिती सदस्य शैलेंश नंदेश्वर, तहसीलदार प्रज्ञा भोकरे, गटविकास अधिकारी हेमराज गौतम, गटशिक्षणाधिकारी एम.डी. पारधी, जिल्हा परिषद सभापती डॉ.लक्ष्मण भगत, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष पंकज रहांगडाले,माजी नगराध्यक्ष आशिष बारेवार, शाळा व्यवस्थापन समितीचे सर्व सदस्य यांनी आंदोलनस्थळी धाव घेत बंद दाराआड बैठकीत विद्यार्थ्यांच्या तक्रारी, पालकांचे आरोप यावर चर्चा केली. या बैठकीनंतर मुख्याध्यापक लोंढे यांना मुख्याध्यापक पदावरून हटविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

मात्र, लोंढे हे शिक्षक म्हणून कार्यरत राहणार असल्याचेही यावेळी स्पष्ट करण्यात आले. दरम्यान, मुख्याध्यापक लोंढे यांच्या कार्यकाळातील सर्व कथित भ्रष्टाचाराची सखोल चौकशी करण्यात येईल आणि दोषी आढळल्यास कारवाई केली जाईल, असे आश्वासन अधिकारी व पदाधिकाऱ्यांनी दिल्याने उशिरा आंदोलन मागे घेण्यात आले.

## अभ्यास दौऱ्याच्या नावावर गोंदिया जि.प.लावतेय निधीची विल्हेवाट

**गोंदिया:-**.गेल्या २५ वर्षापासून गोंदिया जिल्हा परिषदेचे अधिकारी,पदाधिकारी व सदस्य अभ्यासदौऱ्याच्या नावावर दरवर्षाला लाखो रुपयाच्या जिल्हा निधीची विल्हेवाट लावत असल्याचे चित्र आहे.या २५ वर्षात अभ्यास सहलीला गेलेल्या एकाही सदस्याने आजर्पयत आपल्या अभ्यासाचा अहवाल आणि त्याठिकाणी बघितलेल्या योजनेची अमलबंजावणी गोंदिया जिल्हा परिषदेने करावे असा पुढाकार घेतलेला नाही.

गेल्या २५ वर्षाचा हिशोब घेतल्यास अभ्यास दौऱ्यानिमित्त जिल्हा परिषद सदस्यांच्या सहलीवर कोट्यवधी रुपया खर्च झालेला आहे.परंतु एकाही अभ्यास दौऱ्याचा अहवाल कधीच बघावयास मिळालेला नाही.त्यातच महाराष्ट्राबाहेर अभ्यास सहल घेऊन जायचे असल्यास विभागीय आयुक्त व राज्यसरकारची परवानगी घ्यावी लागते,मात्र संबधित विभागाने आजपर्यत कधीच परवानगी घेण्यात आल्याचे कागदोपत्री जिल्हा प्रशासन सादर करु शकले नाही. या अभ्यास सहलीचे नियोजन महिला बालकल्याण विभागातर्फे करण्यात येते.त्याकरीता सर्व विभागाकरीता राखीव असलेला निधी एकत्र केला जातो,एकदा तर खर्चाला घेऊन मोठा गोंधळ पण झालेला होता.त्यातच सदस्यांकरीता असलेल्या अभ्यास सहलीत सर्व सदस्य सहकुटुंब जात असल्याने त्यांच्या खर्चाचा हिशोब काय हा सुध्दा प्रश्न नेहमीच असतो.महिला बालकल्याण विभागाला केंद्रपुरस्कृत योजनेच्या नावावर जरी राज्याबाहेर जायची परवानगी असली तरी महिला सदस्यांशिवाय इतरांना त्या सहलीत जाता येत नाही,मग इतरांचे नियोजन कसे होते हा प्रश्न सुध्दा उपस्थित झालेला आहे.

.ते असो २१ जून २०२४ रोजी जिल्हा परिषदेची सहल अभ्यासाच्या निमित्ताने हिमाचल प्रदेशातील कुल्लू मनाली,रोहतांग व शिमला शहरात जाऊन परता आली,पण त्या सहलीचा अभ्यासाचा अहवाल मात्र विचारणा केल्यावर कुठेच सापडेना म्हणून अभ्यासाचा नावावर जिल्हा निधीची उधळपट्टी कशाला हवी अशा प्रश्न उपस्थित केला जात आहे.अभ्यासावर गलेल्या एकाही सदस्यांने जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेत चर्चा केल्याचेही कधी बघायला काय तर ऐकायलाही मिळाले नाही.

## गोबरधन प्रकल्पासंदर्भात संबंधित अधिकारी, कर्मचाऱ्यावर तात्काळ कारवाई करा

### जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेत माजी सभापती संजय टेंभरे यांची मागणी

**गोंदिया:-** राज्य शासनाच्या वतीने राबविण्यात येत असलेले गोबरधन प्रकल्प नियमानुसार न करता आर्थिक हितसंबंध साधून मनमर्जीपणाने करणाऱ्या तत्कालीन उपमुख्य कार्यकारी अधिकारी पाणी व स्वच्छता, तत्कालीन कार्यकारी अभियंता (ग्रामीण पाणी पुरवठा विभाग) तसेच पाणी व स्वच्छता विभागाचे अभियंता रहमतकर यांच्यावर तात्काळ कारवाई करून फसवणुकीचा गुन्हा दाखल करावा, अशी मागणी जिल्हा परिषद सदस्य व माजी सभापती संजय टेंभरे यांनी जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेत केली.



राज्य शासनाच्या ग्रामीण भागात जनावरांची संख्या अधिक असलेल्या एका गावाची प्रयोगात्मक पद्धतीने गोबरधन प्रकल्प राबविण्यासाठी निवड करावयाची होती. ग्रामीण भागातील निवड करावयाची असल्याने जिल्हा परिषदेच्या पाणी व स्वच्छता विभागाच्या वतीने अंमलबजावणी करण्यात आली. यासाठी ग्रामीण पाणी पुरवठा विभाग तसेच जिल्हा पशू संवर्धन विभागाचे सहकार्य घ्यायचे होते. त्यानुसार अंमलबजावणी करताना जिल्हा पाणी व स्वच्छता विभागाच्या वतीने योग्य ती कार्यवाही करणे अपेक्षित होते. मात्र पाणी व स्वच्छता विभागाचे अभियंता रहमतकर यांनी चुकीच्या पद्धतीने नस्ती हाताळत सदर प्रकल्प शहरी क्षेत्रात मोडत असलेल्या पिंडकेपार येथील गोशाळा येथे राबविण्याबाबत कार्यवाही केली. तत्कालीन उपमुख्य कार्यकारी अधिकारी, तत्कालीन कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा विभाग बेलपत्रे यांनीही त्यास मंजुरी देत कार्य पूर्ण केले. विशेष सदर योजनेसाठी शासनाच्या वतीने ५० लाखांचा निधी मंजूर करण्यात आल्याचे सांगितले जाते. सदर प्रकल्प जनावरांची जास्त संख्या असलेल्या गावात राबविणे अपेक्षित होते. जेणेकरून एखाद्या ग्रामपंचायतीचा आदर्श घेतला गेला असता. मात्र अभियंता रहममतकर यांच्या चुकीच्या व मनमर्जी पणामुळे हा प्रकल्प गोशाळा येथे तयार करण्यात आला असून लाखो रुपये खर्च करूनही बंद अवस्थेत पडून आहे. जिल्ह्यात जास्त जनावरांची संख्या असलेल्या मोठ्या गावापैकी एका गावात हा प्रकल्प राबवून जिल्हा परिषदेला एक गाव आदर्श करता आला असता.

मात्र संबंधित अधिकारी व अभियंता रहमतकर यांच्या आर्थिक हित साधू धोरणामुळे चुकीच्या पद्धतीने सदर प्रकल्प पिंडकेपार येथील गोशाळा येथे तयार करण्यात आले. त्यामुळे सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांची चौकशी दोषी असणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यावर फसवणुकीचा गुन्हा दाखल करावे, अशी मागणी १८ डिसेंबर रोजी झालेल्या जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेत जिल्हा परिषद सदस्य संजय टेंभरे यांनी केली आहे. जर मागणी पूर्ण झाली तर उपोषणावर बसणाऱ्या इशाराही त्यांनी यावेळी दिल्याने आता जिल्हा परिषद अध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी कोणती कारवाई करणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या शुभहस्ते गोंडवाना विद्यापीठाच्या विद्यापीठ तंत्रज्ञान संस्थेचे उद्घाटन

### गडचिरोलीच्या इतिहासाचे सुवर्णपान विद्यापीठ तंत्रज्ञान संस्थेच्या उद्घाटनाने लिहिलं जाईल; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस




**गडचिरोली:-** राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले , गडचिरोली जिल्ह्याची मागास ही ओळख आता पुसून नवा चेहरा जगाच्या पुढे येणार आहे . गडचिरोली हा जिल्हा महाराष्ट्राच्या शेवटचा जिल्हा नसून तो महाराष्ट्राचा पहिला जिल्हा आहे. विद्यापीठ तंत्रज्ञान संस्थेत प्रवेशीत विद्यार्थ्यांना विदेश विद्यापीठात शिकण्याचे संधी प्राप्त होणारे आहे . ही तंत्रज्ञान संस्था गडचिरोली या जिल्ह्यातील होतकरू विद्यार्थ्यांसाठी तंत्र कौशल्य शिक्षणासाठी महत्त्वाचे पाऊल ठरणार आहे . गडचिरोली या जिल्ह्यातील आदिवासी भागात तांत्रिक शिक्षण बळकट करण्याच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल आहे. गडचिरोलीच्या इतिहासाचे सुवर्णपान विद्यापीठ तंत्रज्ञान संस्थेच्या उद्घाटनाने लिहिलं जाईल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस असे प्रतिपादन त्यांनी केले .

गोंडवाना विद्यापीठाचे मेसर्स लॉयड्स मेटल्स ॲण्ड एनर्जी लिमिटेड समवेत सार्वजनिक खाजगी-भागीदारी तत्वावर आयोजित संस्था मविद्यापीठ तंत्रज्ञान संस्थाफाडचिरोलीचा उद्घाटन समारंभ आज राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते अडपल्ली येथे पार पडला. त्यावेळी ते बोलत होते.

समारंभाला प्रमुख अतिथी म्हणून वित्त, नियोजन, कृषी, मदत व पुनर्वसन, विधी व न्याय कामगार राज्यमंत्री तथा गडचिरोलीचे सह-पालकमंत्री आशिष जयस्वाल, राज्यमंत्री पंकज भोयर , विशेष अतिथी गोंडवाना विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे, आमदार धर्मरावबाबा आत्राम ,लॉयड्स मेटल्स ॲण्ड एनर्जी लि.चे व्यवस्थापकीय संचालक बालसुब्रमण्यम प्रभाकरन, आमदार डॉ. मिलिंद नरोटे, जिल्हाधिकारी अविश्यांत पंडा, पोलीस अधीक्षक नीलोत्पल, लॉयड्स मेटल्स ॲण्ड एनर्जी लि. चे लेफ्टनंट कर्नल (निवृत्त ) विक्रम मेहता, कार्यकारी संचालक व्यंकटेश सौंदर्यराजन, निवासी संचालक लॉर्ड्स मेटल्स ॲंड एनर्जी लिमिटेड हिंम्मत सिंग बेदला, प्र-कुलगुरू डॉ. श्रीराम कावळे, कुलसचिव डॉ. अनिल हिरेखण, व्यवस्थापन परिषदेचे सदस्य प्रशांत मोहिते, विवेक गोर्लावर, गुरूदास कामडी, संजय गोरे, लेमराज लडके, रंजना लाड, विद्यापीठाचे न. न. व. सा. संचालक तथा विद्यापीठ तंत्रज्ञान संस्थेचे प्रभारी संचालक प्रा. मनीष उत्तरवार आदी मान्यवर प्रामुख्याने उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विद्यापीठ तंत्रज्ञान संस्थेच्या विविध विभागाना भेटी देत विद्यार्थ्यांशी संवाद साधला. या कार्यक्रमात गोंडवाना विद्यापीठाची विद्यार्थीनी युथ पॅरा गेम्स आर्चरी क्रीडा प्रकारातील दुबई ची विजेती श्वेता कोवे हिचा एक लाख , अकरा हजार रुपयांचा धनादेश देऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

याप्रसंगी बोलताना गोंडवाना विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे म्हणाले, आजचा दिवस गोंडवाना विद्यापीठाच्या इतिहासात मैलाचा दगड आहे. कारण विद्यापीठ तंत्रज्ञान हे महाराष्ट्रातल रोजगार मिळेल हा उद्देश ठेवून विद्यापीठ तंत्रज्ञान संस्था सुरू झालेली आहे. यावर्षी डिप्लोमा करून सुरू आहे . २०२६ मध्ये ते बीटेक सुरू करीत आहोत. विद्यार्थ्यांना शिक्षण देणारी संस्था नसून जोपर्यंत ही संस्था जागतिक दर्जाच्या संशोधन करणारे संस्था म्हणून जगापुढे येणार नाही तोपर्यंत भारत विकसित होणार नाही आता आपण मागास भागातील न राहता हे विद्यापीठ जगाच्या नकाशावर पुढे जाईल. असे ते म्हणाले.



स्वतःचं विद्यापीठ असलेल कदाचित एकमेव असं विद्यापीठ आहे. ज्यात इंजिनिअरिंगचा शिक्षण सुरू आहे त्यामुळे आपण मागास भागात आहोत हे मनातून काढून टाकायला हवे. लॉयल्ड्स मेटल्स ला मॅनपावर, इथून तयार झालेल्या विद्यार्थ्यांना

कार्यक्रमाचे संचालन श्वेता शेलगावकर , आणि आभार गोंडवाना विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. अनिल हिरेखण यांनी केले. कार्यक्रमाला शहरातील गणमान्य नागरिक, शिक्षक वृंद आणि विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते .



बेरार टाईम्स दिनदर्शिकेचे मान्यवरानी केले स्वागत.















## गड्डाटोलीत डिग्रीशिवाय बापलेकाने थाटला दवाखाना

**गोंदिया** :- शहरातील गड्डाटोली, जनकनगर येथील गिरधारी गजभिये यांच्या घरी भाड्याने स्वामी आयुर्वेदिक उपचार केंद्र थाटून औषधोपचार करणारे बापलेक बोगस डॉक्टर असल्याचे जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. पुरुषोत्तम पटले यांच्या पाहणीत उघड झाले आहे. याप्रकरणी बुधवारी (दि.२४) कारवाई करण्यात आली.




डॉ. महेंद्र स्वामी व त्याचे वडील डॉ. गौतम स्वामी यांनी जवळपास दीड वर्षांपूर्वी आयुर्वेदिक दवाखाना चालवत असल्याच्या नावावर गिरधारी गजभिये यांच्या घरी भाड्याने खोली घेतली होती. स्वामी आयुर्वेदिक उपचार केंद्र असे नाव देऊन यांनी दुकानदारी थाटली. डॉ. महेंद्र स्वामी व डॉ. गौतम स्वामी हे दोघेही बापलेक मूळव्याध, भगंदर व इतर प्रकारच्या आजारांवर उपचार करत होते. शहरासह ग्रामीण भागातील रुग्णही उपचारासाठी येत होते. परंतु, त्यांच्या औषधोपचारांनी आजार कमी होण्यापेक्षा अधिक वाढत असल्याच्या तक्रारी वाढू लागल्या. त्यामुळे रुग्णांच्या जिवाला धोका होण्याची शक्यता नाकारता येत नव्हती. ही बाब लक्षात येताच घरमालक गिरधारी गजभिये यांचा मुलगा प्रशांत गजभिये यांनी याबाबतची तक्रार १८ डिसेंबर रोजी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. पुरुषोत्तम पटले यांच्याकडे केली.

या तक्रारीवरून डॉ. पटले यांनी १९ डिसेंबर रोजी डॉ. स्वामी चालवत असलेल्या आयुर्वेदिक उपचार केंद्रास भेट देत पाहणी केली. या पाहणीत दोघाही बापलेकाकडे कोणतीही वैद्यकशास्त्राची वैध पदवी, पदविका आणि तसे प्रमाणपत्र आढळले नाही. अवैधरित्या आयुर्वेदिक उपचार केंद्र चालवत असल्याचे स्पष्ट झाले. त्यामुळे जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. पटले यांनी हे उपचार केंद्र ताबडतोब बंद करण्याचे पत्र डॉ. स्वामी यांना दिले. अवैधरित्या औषधोपचाराचा हा प्रकार बंद न केल्यास पोलिसात तक्रार केली जाईल, असा इशाराही दिला.

## संपादकीय

### शरद पवारांचे राजकारण:भांडवलशाही,सत्ताकेंद्र

महाराष्ट्राच्या राजकीय इतिहासात शरद पवार हे नाव अत्यंत प्रभावशाली, दीर्घकाळ टिकलेले आणि वादग्रस्त राहिले आहे. समर्थकांच्या मते ते चाणाक्ष, दूरदृष्टीचे आणि कुशल रणनीतीकार आहेत; तर टीकाकारांच्या मते ते सत्तेसाठी कोणतीही तडजोड करणारे, भांडवलदारांना पोसणारे आणि लोकशाही मूल्यांपेक्षा सत्तासंतुलनाला प्राधान्य देणारे नेते आहेत. मात्र गेल्या चार–पाच दशकांच्या राजकारणाचा चिकित्सक आढावा घेतला तर एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते. महाराष्ट्रात शिवसेना, भाजपा आणि संघपरिवाराला बळ मिळण्यामागे थेट किंवा अप्रत्यक्षरीत्या शरद पवारांची भूमिका अत्यंत निर्णायक राहिली आहे. ही भूमिका उघडपणे वैचारिक समर्थनाची नसली, तरी सत्ताकारण, तडजोडी, आघाड्या आणि राजकीय व्यवस्थापनाच्या माध्यमातून घडलेली आहे.

शरद पवारांची ओळख प्रामुख्याने “रयतेचा राजा” म्हणून घडवली गेली. पश्चिम महाराष्ट्रातील सहकारी चळवळ, साखर कारखाने, दूध संघ, शिक्षणसंस्था आणि ग्रामीण अर्थकारणाशी जोडलेल्या संस्थांवर त्यांचे प्रभुत्व हे या प्रतिमेचे मुख्य आधार होते. मात्र या सहकारी व्यवस्थेचा बारकाईने विचार केला असता असे लक्षात येते की ही रचना सामान्य शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणासाठी न राहता एका मर्यादित राजकीय–आर्थिक वर्गाच्या हातात सत्ताकेंद्रित झाली. सहकारातून समाजवाद उभा राहण्याऐवजी सहकारातून भांडवलशाही मजबूत झाली. संस्था लोकशाही राहिल्या नाहीत; त्या कुटुंबकेंद्रित, गटाधारित आणि सत्तेच्या टिकावासाठी वापरल्या जाणाऱ्या यंत्रणा बनल्या.

या प्रक्रियेत सामान्य शेतकरी व्यवस्थेचा लाभार्थी न राहता तिचा आश्रित बनत गेला. कर्ज, साखळी, राजकीय निष्ठा आणि निवडणुकीतील अवलंबित्व यामध्ये अडकलेला शेतकरी स्वतंत्र नागरिक न राहता व्यवस्थेचा भाग बनला. “रयतेचा राजा” ही प्रतिमा भावनिक पातळीवर प्रभावी असली, तरी तिच्यामागील वास्तव हे सत्ताकेंद्रित आणि वर्गीय स्वरूपाचे होते.

१९९० नंतर देशात नवउदार आर्थिक धोरणांची अंमलबजावणी सुरू झाली. खासगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरण या धोरणांनी भारतीय अर्थव्यवस्थेचा चेहरा बदलला. या टप्प्यावर शरद पवारांनी या प्रक्रियेचा विरोध केला नाही, उलट त्यांनी त्याच्याशी जुळवून घेतले. कृषी क्षेत्रात खासगी कंपन्यांचा प्रवेश, करार शेती, अन्नप्रक्रिया उद्योगांचे प्रोत्साहन, मोठ्या कॉर्पोरेट गटांना दिलेले सवलतीचे धोरण या सगळ्यांमध्ये त्यांची भूमिका सहमतीचीच राहिली. शेतकरी उत्पादन प्रक्रियेच्या केंद्रस्थानी राहण्याऐवजी बाजारव्यवस्थेचा दुय्यम घटक बनत गेला.

या सगळ्याचे अत्यंत विदारक प्रतिबिंब २००४ ते २०१४ या काळात दिसते, जेव्हा शरद पवार सलग दहा वर्षे देशाचे कृषिमंत्री होते. हा काळ महाराष्ट्रासाठी विशेषतः शेतकरी आत्महत्यांचा काळ म्हणून ओळखला जातो. विदर्भ, मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रात हजारो शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. सरकारी आकडेवारीनुसार या काळात महाराष्ट्रात आत्महत्यांची संख्या लाखांच्या आसपास पोहोचली होती. सततचे दुष्काळ, पीक अपयश, वाढता उत्पादन खर्च, बाजारभावातील अनिश्चितता, कर्जाचा डोंगर आणि सरकारी मदतीचा अभाव यामुळे शेतकरी अक्षरशः उद्ध्वस्त झाला.

या पार्श्वभूमीवर कृषिमंत्री म्हणून शरद पवारांनी मूलगामी उपाययोजना केल्या का, हा प्रश्न आजही अनुत्तरित आहे. उत्पादन खर्चावर आधारित हमीभाव, प्रभावी कर्जमाफी, मजबूत पीकविमा व्यवस्था, बाजारावर नियंत्रण, दलाल–मुक्त व्यवस्था या सगळ्या बाबतीत ठोस धोरण दिसून आले नाही. उलट काही वेळा शेतकरी आत्महत्यांबाबत केलेली विधाने असंवेदनशील वाटली. ही भूमिका एका कृषिमंत्र्याला शोभणारी नव्हती आणि त्यामुळे शेतकरी वर्गात प्रचंड असंतोष निर्माण झाला.

या आर्थिक अपयशाइतकाच गंभीर मुद्दा म्हणजे आंबेडकरी राजकीय चळवळीचा झालेला ऱ्हास. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी उभारलेली चळवळ ही सामाजिक परिवर्तन, समता आणि स्वाभिमानावर आधारित होती. ती केवळ निवडणूक जिंकण्यासाठी नव्हे, तर शोषणविरोधी संघर्षासाठी उभी होती. मात्र महाराष्ट्रात ही चळवळ स्वतंत्र आणि स्वायत्त राजकीय शक्ती म्हणून उभी राहू नये यासाठी विविध स्तरांवर प्रयत्न झाले. या प्रक्रियेत शरद पवारांची भूमिका निर्णायक ठरली.

आंबेडकरी नेत्यांना सत्तेच्या जवळ खेचणे, मंत्रीपदे देणे, आघाड्यांमध्ये सामावून घेणे, निवडणूक समन्वय करणे या सगळ्यामुळे चळवळीची धार बोथट होत गेली. संघर्षाऐवजी समन्वय, वैचारिक ठामपणाऐवजी तडजोड, आणि परिवर्तनाऐवजी सत्तेत सहभाग हे सूत्र रूढ झाले. परिणामी आंबेडकरी राजकारण तुकडे–तुकडे झाले आणि स्वतंत्र राजकीय पर्याय म्हणून उभे राहू शकले नाही.

या राजकीय पोकळीतूनच शिवसेना आणि नंतर भाजपा यांना विस्ताराची संधी मिळाली. दलित, ओबीसी, तरुण आणि मध्यम वर्गीय घटकांमध्ये वाढत असलेली असुरक्षितता, बेरोजगारी आणि असंतोष यांना पुरोगामी पर्याय मिळाला नाही. परिणामी आक्रमक राष्ट्रवाद, धार्मिक ओळख आणि भावनिक राजकारणाला वाव मिळाला. काँग्रेस–राष्ट्रवादी आघाडी वैचारिकदृष्ट्या निष्प्रभ ठरत गेली आणि त्याचा थेट फायदा हिंदुत्ववादी शक्तींना झाला.

शरद पवारांनी अनेक टप्प्यांवर भाजपशी प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष सहकार्य केले. सत्ता टिकवण्यासाठी किंवा राजकीय संतुलन राखण्यासाठी वैचारिक विरोध बाजूला ठेवण्यात आला. त्यामुळे भाजप हळूहळू स्वीकारार्ह बनत गेली. आज जेव्हा अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस थेट भाजप सरकारमध्ये सहभागी झाली आहे, तेव्हा ती एखादी अचानक घडलेली घटना नाही, तर गौतम अडाणी आणि शरद पवार यांच्यातील घनिष्ट मैत्री व शरद पवारांनी दीर्घकाळ जोपासलेल्या सत्ताकेंद्रित राजकारणाची स्वाभाविक परिणती आहे.

याच संदर्भात बारामती येथे गौतम अदानी यांच्या हस्ते आर्टिफिशियल इंटेलिजन्स केंद्राचे उद्घाटन होणे हे केवळ तांत्रिक किंवा विकासात्मक कार्यक्रम नाही, तर एका दीर्घ राजकीय प्रवासाचे प्रतीक आहे. भांडवल, सत्ता आणि राजकारण यांचा घट्ट गठजोड आज उघडपणे दिसतो. अदानीसारख्या उद्योगसमूहांचा वाढता प्रभाव आणि त्यांना मिळणारे राजकीय संरक्षण हे योगायोग नाही, तर नव–उदारवादी राजकारणाचे अपरिहार्य परिणाम आहेत. शरद पवारांचे राजकारण या प्रक्रियेला विरोध करणारे नसून, अनेक बाबतींत तिच्याशी सुसंगत राहिले आहे.

दुर्दैवाने महाराष्ट्रातील सामान्य जनता अजूनही शरद पवारांकडे “पुरोगामी”, “धर्मनिरपेक्ष” आणि “रयतेचा नेता” म्हणून पाहते. हीच सर्वात मोठी गल्लत आहे. कारण वास्तवात त्यांच्या राजकारणाने ना शेतकऱ्यांना दीर्घकालीन संरक्षण दिले, ना आंबेडकरी चळवळीला बळ दिले, ना बहुजन राजकारणाला स्वतंत्र दिशा दिली. उलट भांडवलशाही, हिंदुत्ववादी संघटना, सत्ताकेंद्र आणि संधीसाधूपणाला वैधता मिळत गेली.

महाराष्ट्राला आज गरज आहे ती या भ्रमातून बाहेर पडण्याची. व्यक्तीपूजा आणि चाणाक्षपणाच्या कथांऐवजी राजकारणाचे सामाजिक परिणाम तपासण्याची. सत्तेच्या खेळाऐवजी मूल्याधिष्ठित, समतावादी आणि संघर्षशील राजकारण उभे करण्याची. जोपर्यंत ही चिकित्सा प्रामाणिकपणे होत नाही, तोपर्यंत “रयतेचा राजा”सारख्या प्रतिमा वास्तव झाकत राहतील आणि सामान्य जनता शोषणाच्या चक्रात अडकलेली राहील.

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,शिवनगर गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ८०८०८१५३२९ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)

# युगस्त्री सावित्रीबाई आणि बहुजन स्त्री



वेळ आणि काळ कुणासाठी थांबत नसतो. अमे म्हणतात, की काळासोबर वाहणारे अनेकजण असतात. प्रवाहाच्या दिशेने पोहणाऱ्यांची संख्या उदंड असते, काळाच्या पुढे आणि त्याच्या प्रवाहाविरुद्ध पोहणाऱ्यांची संख्या साहजिकच बोटावर मोजण्या इतपत राहिल. प्रवाहाच्या दिशेने पोहून किनारा गाठणाऱ्यांचे नवल ते का. परंतू प्रवाहाच्या विरुद्ध दिशेने पोहूनही किनाऱ्याला पोहचणाऱ्यांच्या धाडसाचे मिश्रीत वेगळेच मोल असते. म्हणून अशा काळाच्या पुढे धावणाऱ्या काही थोर महात्म्यांच्या जीवन कर्तृत्वाचा आलेख पाहने आपल्यासाठी प्रेरणादायी असते.

दिडशे वर्षापूर्वी वय फक्त नऊ वर्ष असेल तेव्हा तेरा वर्षाच्या मुलाबरोबर विवाह झालेला आजच्या संदर्भात विचार केल्यास तिसऱ्या वर्गातील विद्यार्थीनी असावी इतपत वय. सासरी येऊन नवऱ्या मुलाबरोबर चार भिंतीच्या आत संसार करावा अशी त्यावेळची परिस्थिती. शिक्षणाचा गंध तर नाहीच, पुस्तकाला शिवण्याचीही धर्ममार्तडांची बंदी, खुद्द स्वतःच्या जातीतील स्त्रियांनाही बंदी तर इतरांच्या बाबतीत त्यांचे विचार काय असावे, जिथे शुद्रातीशुद्रांच्या पुरुषांना शिक्षण बंदी त्याठिकाणी स्त्रियांच्या बाबतीत विचार कसला असेल?

सावित्रीबाई फुले यांनी जोतीरावांच्या मृत्यूनंतर सत्यशोधक समाजाचे कार्य हाती घेऊन १८९३ साली नामवर येथील २०च्या परिषदेचे त्या अध्यक्ष म्हणून उपस्थित राहून मार्गदर्शन केले. याच काळात पुरंदर तालुक्यात ग्रामिण भागात १०० लग्ने, विधवा विवाह आणि इतर धार्मिक कार्य ब्राम्हण पुरोहितावाचून करण्यात आले. अनाथांची माऊली, शेतकरी शेतमजूरांची मार्गदाती, पहिली शिक्षिका, पहिली मुख्याध्यापिका १० मार्च १८९७ ला मृत्यू पावली. एका क्रांतीयुगाचा अस्त झाला. आजही ज्योतीराव फुले–सावित्रीआई फुले या दोन सामाजिक क्रांतीच्या अग्रदुतांच्या विचाराशिवाय कोणतीही परिवर्तनवादी चळवळ पुढे जाऊ शकत नाही, एवढे महान कार्य करणाऱ्या सावित्रीबाईचे जीवन बहुजन स्त्रियांना प्रेरणादायी आहे. बहुजन समाजातील स्त्री आज शिकते आहे. शिक्षणाचे प्रमाण अजूनही ब्राह्मणांच्या स्त्रियांच्या मानाने कमी असले तरी शिकत आहे. असे असले तरी बहुजन स्त्री पुरुषांची वैचारिक वाटचाल भट ब्राह्मणांच्या कारस्थानाना बळी पडलेली दिसून पूजापाती करण्याम मशुल आहे. देव्हात्यातील देव पुजण्यातच तिचे आयुष्य खर्चिले जात आहे. सावित्रीने रुजविलेली क्रांतीबीजे अजून बहुजन स्त्रीयांमध्ये रुजलेली नाहीत. (काही अपवाद वगळता) पती मरण पावल्यास विधवा स्त्रीयांनाही पुनर्विवाहास बंदी ब्रह्मदेवाच्या तोंडातून जन्मलेल्या महाशयांची ही आज्ञा तीला कोण अव्हेरणार! ब्रह्मदेवाचे अनंगय सुपुत्र ती मोडणार कशी? अशा परिस्थितीत त्यांच्याच विषयवासनेला बळी पडत असताना विषात्या बळी पडलेल्या स्त्रीयांनी आपली पोटची मुले मारुन टाकाची पण मानवतेचा कळस गाठलेल्या ज्योती सावित्रीने मात्र त्यांच्याकरिता बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना करुन जीवनदान दिये. आजही अंगावर रोमांच उभे करणारी ही गोष्ट त्यावेळी करणे म्हणजे धाडसाचे परमाच्चशिवर गाठणे होय.

सावित्रीबाई फूले सन १८५४ मध्ये काव्यफुले हा पहिला काव्यसंग्रह प्रसिद्ध करून पहिली आधुनिक आद्यकवयित्री झाल्या. या माऊलीने रात्रशाळा कानून अध्यापन केले. नायकार, भट, कारकून, वतनदार यांच्याकटून होणारी फसवणूक थांबावी हा त्यामागील खरा उद्देश होता, सन १८६४ मध्ये त्यांनी अनाथ बालकाश्रम चालविला. तेथील लेकरांना जीवापाड जपने, त्यांना शिक्षित केले. खऱ्या अर्थाने त्या दिनदुबळ्यांची मावली झाल्या. दुष्काळात गुरेरेव माणसे अन्नधान्यविना मृत्यूमुखी पडत, त्यावेळी पुणे परिसरात ५२ अन्नद्रवे उघडून सत्यशोधक समाजातर्फे चाललेल्या दुष्काळ निवारण कार्याचे खंबीर नेतृत्व केले. दत्तक पुत्र यशवंतरावांचा सत्यशोधक समाजाचे कार्य करणाऱ्या ग्यानोबा कृष्णाजी ममाणेंच्या मुलींशी पहिला आंरतजातीय विवाह ४ फेब्रुवारी १८८९ घडवून आणला.

फुले दाम्पत्यांनी लावलेल्या शिक्षणरुपी वृक्षामुळेच आजच्या स्त्रिया ह्या विविध पदांवर विराजमान होत आहेत. असे असूनही अनेकींना सावित्रीबाई फुले यांचे नाव घेणे कमीपणाचे वाटते. जातीचा खोटा अभिमान असावा तो.

ता. १ में १८४९ रोजी उस्मान शेख यांच्याही वाट्यात शाळेची स्थापना केली. आणि येथेही सावित्रीबाईनी अध्यापन कार्य करुन त्यातील काही शाळांमध्ये शिक्षिका म्हणून कार्य चले. शुद्रातीशुद्रांच्या शिक्षणासाठी अहोरात्र झटणाऱ्या दोन सामाजिक क्रांतीच्या अग्रदुतांना समाजातील इतर मंडळीकडून त्रास होऊ लागला, त्यातच कळस म्हणजे १८४९ ला शुद्रातिशुद्रांच्या शिक्षणासाठी पती जोतीरावांबरोबर गृहत्याग करावा लागला. विशिष्ट ध्येयाने प्रेरित झालेल्यांना हालअपेष्टांची पर्वा नसते. म्हणून सावित्रीबाई जोतीरावांच्या खांद्याला खांदा लावून स्त्री शिक्षणाचे कार्य करीत राहिल्या. याच कार्याची पावती म्हणजे १८५२ साली शाळांची तपासणी होऊन सावित्रीबाईंना आदर्श शिक्षिका म्हणून अभिप्राय देण्यात आला.

ता. १२ रेब्रुवारी १८५३ मा मेजर कंडी याच्या हस्ते फुले दाम्पत्यांचा विश्राम बागेतील वाड्यात गौरव करण्यात आला. इंग्रजांनी ज्या फुले दाम्पत्याचा गौरव केला. तिथे येथील मातीत जगणाऱ्या परजीवी उच्चवर्णीयांनी मात्र दोन शब्द चांगल लिहिले नाहीत. यातच त्यांच्या जातीद्वेषाची वृत्ती दिसून येते.

ज्योतीराव व सावित्रीबाईंनी स्त्री शिक्षणाचे महत्वाचे कार्य तर केलेच त्याचबरोबर क्रांतीकारी अशा एका कार्याची सुरुवात केली होती. तो काळ पाहता ब्रम्हवृंदाच्या पेशवाईचा स्त्रीला शिक्षण घेण्यास बंदी, त्याचबरोबर बालविवाह, वर्षानुवर्षे खोटे नाट्य, लबाड्या करुन शुद्रातिशुद्रांना लुबाडणाऱ्याने झालेल्या कुचकामी कागदांच्या आधारे पंचांगाच्या आधारे भविष्य कथन करणाऱ्या एकाही अभ्यासू जोशी–भटाला ज्योती सावित्रीबाईच्या आयुष्याचे भविष्य सांगता आले नाही.

सन १८४० साली विवाह आणि १८४२ साली सावित्रीबाईने शिक्षणास प्रारंभ केला, अविद्या हीच खरी शुद्रांच्या अधःतपणास कारणीभूत आहे. हे अचूक जाणणाऱ्या जोतीरावांनी आपल्या पत्नीस शिकविले नसते तर नवलच झाले असते. विरोधाला न जुमानता १८४७ साली सावित्रीबाईंनी नॉर्मल स्कूलमधून शिक्षण पूर्ण केले. भारतातील पहिली शिक्षीका होण्याचा बहुमान एका शुद्र स्त्रीला मिळाला होता. मनुवाद्यांच्या एखाद्या स्त्री पुरुषाला असा सम्मान प्राप्त झाला असता तर आज प्रत्येक जान्हबंधाऱ्यांनी आपल्या घरातील देव्हाड्यात फोटो लावून त्याची पूजा मांडली असती. पण त्यांच्यावर तर शेण–दगडधोंडे फेकल्या गेले. ता. १ जानेवारी १८४८ ला तब्बल १६० वर्षापुर्वी पुणे येथे भिडेवाड्यात मुलींच्या पहिल्या शाळेची स्थापना करण्यात आली आणि भारतातील पहिली स्त्री शिक्षीका सावित्रीबाई झाली.

त्या शिक्षणाचा फायदा ब्राम्ह स्त्रियांना झाला. ब्राम्हण मुली शिकू लागल्या. बहूजन स्त्री सत्यशोधकी विचार रुजविण्याचा, वैज्ञानिक दृष्टीकोन अंमलात आणण्याच्या याच मार्गावर गेल्याने तिची प्रगती होणार आहे. सत्यनावाची सावित्री माहिती असणाऱ्या स्त्रियांना क्रांतोज्योती सावित्रीचे नाव माहित नाही. अजूनही सत्यनावाची सावित्रीच त्यांचे आदर्श आहे. काहींना कळते पण वळत नाही अशी परिस्थिती आहे. बहुजन स्त्रिने सावित्रीबाई फुले यांना आदर्श मानावे. पुरुषांनीही त्यांच्यात सत्यशोधकी विचार रुजवावे. यातच बहुजन स्त्रियांच्या मुलींचा मार्ग आहे.

**सतिश जामोदकर**
मु.पो. हिवरा यु. ना. मानोरा
मो. ९४२३३७४६७८

## ३३ व्या झाडी बोली साहित्य संमेलनांचे सूप वाजले,संमेलनात सहा ठराव पारित



**गडचिरोली:**–जिल्ह्यातील काटली गावी दोन दिवसीय ३३ व्या झाडी बोली साहित्य संमेलनाचा समरोप संमेलनाचे अध्यक्ष प्रसिद्ध कवी, लेखक यांच्या उपस्थितीत संपन्न झाला,आणि सहा ठराव पारित करुन संमेलनाचे सूप वाजले.याप्रसंगी बोली महर्षी डॉ हरिश्चंद्र बोरकर, ग्रामगीताचार्य बंडोपंत बोढेकर, डॉ हेमराज निखाडे,प्रा विनायक धानोरकर, डॉ चंद्रकांत लेनगुरे, डॉ संजय निंबेकर, संरपंच अरविंद उंदिरवाडे, उपसरपंच पार्वता खेडेकर, टेकाजी उंदिरवाडे इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

सदर संमेलनात खालील ठराव मांडण्यात आले. गोंडवाना विद्यापीठाने ङ्गझाडीबोली दालनफ निर्माण करून यावर्षी झाडीबोली नाट्य महोत्सव सुरू केला. याबद्दल गोंडवाना विद्यापीठाचे आभार मानण्यात येत आहेत. भंडारा व गोंदिया हे जिल्हे आज तारखेस गोंडवाना विद्यापीठाशी संलग्न नाहीत. सबब भंडारा व गोंदिया हे जिल्हे गोंडवाना विद्यापीठाशी संलग्न करण्यात यावेत. मुलांच्या वयांचा विचार करून प्राथमिक शाळेच्या इमारतीची प्रत्येक पायरी ३ इंचच्या उंचीची असावी अशी मागणी करण्यात येत आहे.झाडीपट्टीतून धावणाऱ्या गोंदिया ते चंद्रपूर या आगगाडीचे नाव “झाडीबोली एक्सप्रेस’ असे ठेवण्यात यावे.

इयत्ता चवथी मधील इतिहासाच्या पुस्तकात विदर्भाला सुद्धा समृद्ध इतिहासाचा त्याचा समावेश असावा, नाग नदी स्वच्छ करण्यासाठी शासनाने शक्य ते सर्व उपाय युध्द पातळीवर राबवावेत तथा नाग नदीचे प्रदूषित पाणी इतर नद्यात सोडू नये. या ठरावेचे वाचन डॉ प्रवीण किलनाकेंनी केले.दुसऱ्या दिवशी कवयित्री अंजनाबाई खुणेंच्या अध्यक्षतेखाली कविसंमेलन रंगला. यानंतर “आमच्या नद्या’ यावर डॉ राजकुमार मुसणेंच्या अध्यक्षतेखाली बातचित रंगली.यात डॉ मनोहर नरांजे,शरद सहारे, कुंजीराम गोंधळे यांनी सहभाग घेतला.बोली महर्षी डॉ हरिश्चंद्र बोरकरांच्या मुलाखतीचा कार्यक्रम पार पडला.

डॉ संजय निंबेकर व विद्या भदाडेंनी मुलाखतीत रंग भरला.डॉ लेनगुरे यांना “ वैद्यकीय सेवा पुरस्कार’ देण्यात आला.समारोप सत्राचे संचालन वर्षा पडघन तर आभार डॉ राम वासेकरांनी केले. यशस्वीतेसाठी डॉ.लेनगुरे,प्रा धानोरकर, संजीव बोरकर व गडचिरोली जिल्हा झाडी बोली साहित्य मंडळ शाखेच्या सदस्यांनी मोलाचे सहकार्य केले.

## परिस्थिती हे कारण नसून प्रेरणा बनवा–उपजिल्हाधिकारी वाघमारे



**देवरी:**– मतुमच्या घरात अडचण असेल, आर्थिक परिस्थिती हलाखीची असेल किंवा सोयी–सुविधांचा अभाव असेल, तर त्याचा वापर अपयशाचे मकारणफ म्हणून करू नका. उलट, त्या परिस्थितीला आपली शक्ती आणि प्रेरणा बनवा. माझी परिस्थिती खराब आहे, म्हणूनच मला अभ्यास करून ती बदलायची आहे, ही जिद्द उराशी बाळगा, मअसे प्रेरक आवाहन वर्धा येथील उपजिल्हाधिकारी प्रताप वाघमारे यांनी केले.

ग्रामीण व आदिवासी भागातील विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी आणि स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने, दिनबंधु ग्रामीण विकास संस्था देवरीच्या वतीने नवनिर्मित मदिनबंधु अभ्यासिकेचा लोकार्पण सोहळा व स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन मेळावा २८ डिसेंबर रोजी पार पडला. यावेळी मुख्य मार्गदर्शक म्हणून ते बोलत होते.

कार्यक्रमाचे उद्घाटन आमदार संजय पुराम यांच्या हस्ते करण्यात आले. संस्थेचे मार्गदर्शक वीरेंद्र अंजनकर यांनी कार्यक्रमाचे अध्यक्षपद भूषविले. विशेष अतिथी म्हणून उपविभागीय अधिकारी कविता गायकवाड, प्रकल्प अधिकारी उमेश काशीद उपस्थित होते. प्रमुख अतिथी म्हणून नगराध्यक्ष संजू उईके, पोलीस निरीक्षक प्रवीण डांगे, नगरसेवक आफताब शेख, नूतन सयाम, पिंकी कटकवार, तनुजा भेलावे, शकील कुरेशी, सामाजिक कार्यकर्ते यादव पंचमवार, प्रवीण दहिकर, छोटेलाल बिसेन, दयाराम लांजेवार आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकातून दिनबंधु ग्रामीण विकास संस्थेचे अध्यक्ष कुलदीप लांजेवार यांनी संस्थेच्या सामाजिक व शैक्षणिक कार्याचा आढावा सादर केला. उपस्थित मान्यवरांनी अभ्यासिकेतील अत्याधुनिक सोयी–सुविधांची पाहणी करून प्रशंसा केली. कार्यक्रमाचे संचालन यज्ञराज रामटेके यांनी केले तर आभार संस्थेचे विश्वस्त चेतन उईके यांनी मानले. या सोहळ्याच्या यशस्वीतेसाठी संस्थेच्या सर्व सदस्यांनी व मित्र परिवाराने अथक परिश्रम घेतले.

### उत्कृष्ट क्रीडा व सांस्कृतिक महोत्सव आयोजनासाठी जांभळी (दोडके) ला जिल्ह्यात प्रथम पुरस्कार

गोंदिया–जिल्हा परिषद गोंदिया अंतर्गत सत्र २०२५–२६ मध्ये आयोजित करण्यात आलेल्या अटल क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवात उत्कृष्ट नियोजन, शिस्तबद्ध व्यवस्था आणि लोकसहभागाच्या जोरावर जांभळी (दोडके), ता. सडक अर्जुनी येथे पार पडलेल्या तालुकास्तरीय महोत्सवाला जिल्ह्यात प्रथम कमांकाचा मान प्राप्त झाला आहे.आठही तालुक्यांत अटल क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये पंचायत समिती सडक अर्जुनी अंतर्गत जिल्हा परिषद व प्राथमिक शाळा जांभळी यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या महोत्सवाची निवड सवीत्कृष्ट तालुका स्तरीय आयोजन म्हणून करण्यात आली.
हा पुरस्कार बोंडगाव देवी येथे पार पडलेल्या जिल्हास्तरीय बक्षीस वितरण सोहळ्यात प्रदान करण्यात आला.

## गाळमुक्त धरण-गाळयुक्त शिवार, जलसंधारणातून शाश्वत शेतीकडे वळूया



वारंवार जाणवणारी पाणीटंचाई, कमी होत जाणारी भूजल पातळी आणि शेतीसमोरील आव्हाने लक्षात घेता शासनाने गाळमुक्त धरण–गाळयुक्त शिवार हे महत्त्वाकांक्षी अभियान सुरू केले आहे. या अभियानाच्या माध्यमातून धरणे, तलाव, बंधारे व इतर जलसाठ्यांमध्ये वर्षानुवर्षे साचलेला गाळ काढून जलसाठ्यांची साठवण क्षमता वाढविणे आणि तोच सुपीक गाळ शेतजमिनीत वापरून शेतीची उत्पादकता वाढविण्याचा दुहेरी उद्देश साध्य करण्यात येणार आहे.

या अभियानामुळे जलसाठ्यांतील गाळ काढून टाकल्याने पावसाचे पाणी अधिक प्रमाणात साठवणे शक्य होऊ शकेल. परिणामी धरणांची पाणी साठवण क्षमता वाढून सिंचनासाठी तसेच पिण्याच्या पाण्यासाठी उपलब्धता सुधारण्यासाठी मदत होणार आहे. सुपीक गाळ शेत शिवारात टाकण्यात येत असल्याने जमिनीची पोत सुधारून, सेंद्रिय कर्बाचे प्रमाण वाढते आणि उत्पादनक्षमता लक्षणीयरीत्या वाढेल. रासायनिक खतांवरील अवलंबित्व कमी होऊन शाश्वत शेतीला चालना मिळणार आहे.

“गाळमुक्त धरण–गाळयुक्त शिवार” हे अभियान लोकसहभागावर आधारित असल्यामुळे त्याला विशेष महत्त्व प्राप्त होणार आहे. जिल्हा प्रशासन, जलसंधारण विभाग, ग्राम पंचायती, शेतकरी, स्वयंसेवी संस्था व यंत्रणांचा सक्रिय सहभाग आवश्यक आहे. लोकसहभागातून कामे झाल्याने शासनाचा खर्च कमी होतो तसेच कामांची गती आणि गुणवत्ता वाढेल. अनेक ठिकाणी शेतकऱ्यांनी स्वयंस्फूर्तीने पुढाकार घेत जलसाठे गाळमुक्त करण्यासाठी सहकार्य करत आहे.

या अभियानामुळे केवळ शेतीच नव्हे तर संपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्थेला

**गाळमुक्त धरण – गाळयुक्त शिवार हे अभियान जिल्ह्यातील जलसुरक्षा मजबूत करण्यासाठी अत्यंत प्रभावी ठरणार आहे. जलसाठ्यांमधील साचलेला गाळ काढल्यामुळे धरणांची साठवण क्षमता लक्षणीयरीत्या वाढत असून पावसाचे पाणी अधिक प्रमाणात अडविणे शक्य होणार आहे. त्याचबरोबर हा सुपीक गाळ शेतकऱ्यांच्या शिवारात वापरल्याने जमिनीची गुणवत्ता सुधारून शेती उत्पादनात वाढ होऊ शकते. जिल्हा प्रशासनाच्या मार्गदर्शनाखाली सर्व यंत्रणा, ग्रामपंचायती आणि शेतकरी यांच्या सक्रिय सहभागातून हे अभियान यशस्वीपणे राबविले जात आहे. लोकसहभागाच्या बळावर जलसंधारणाची कामे पूर्ण करून दुष्काळमुक्त व समृद्ध जिल्हा घडविण्याचा आमचा संकल्प आहे.**

**श्याम फेरवानी**
**जिल्हा जलसंधारण अधिकारी**

बळकटी मिळणार आहे. पाण्याची उपलब्धता वाढल्याने दुबार पिके घेणे शक्य होत असून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढण्यास मदत होणार आहे. तसेच भूजल पातळी उंचावल्याने विहिरी, बोअरवेल यांना दीर्घकाळ पाणी उपलब्ध राहु शकते. पर्यावरणीय समतोल राखत दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी हे अभियान अत्यंत उपयुक्त ठरणार आहे.

एकूणच “गाळमुक्त धरण–गाळयुक्त शिवार” हे अभियान जलसंधारण, शेती विकास आणि पर्यावरण संरक्षण यांचा सुंदर संगम साधणारे आहे. पाणी म्हणजे जीवन हे सूत्र प्रत्यक्षात उतरवत, भावी पिढ्यांसाठी जलसुरक्षित महाराष्ट्र घडविण्याच्या दिशेने हे अभियान एक महत्त्वाचे पाऊल ठरणार आहे.

**अनिल कुरकुटे**
जिल्हा माहिती कार्यालय वाशिम

# सुरगाव ठरले देशात आदर्श गाव



**अर्जुनी मोरगाव:**– भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त (७५ वर्षे) नागपूर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकरराइट्स मीडिया वेल्फेअर असोसिएशनतर्फे मसंविधान वाचन (पुष्प दुसरे)फ या उपक्रमांतर्गत जिल्ह्यातील अर्जुनी मोरगाव तालुक्यातील लहानशा सुरगाव येथे शनिवारी (दि. २७) सायंकाळी ६ वाजता १ ते ५१ कलमांचे सामूहिक संविधान वाचन मोठ्या उत्साहात पार पडले.

सुरगाव येथील रमाई बौद्ध विहार परिसरात पार पडलेल्या या कार्यक्रमात संविधानाचे वाचन हे केवळ औपचारिक न राहता, ते लोकशिक्षण, लोकजागृती आणि लोकशक्तीच्या पुनरुज्जीवनाचे माध्यम ठरले, असे उपस्थित मान्यवरांनी नमूद केले. यावेळी भागवत लांडगे यांनी संविधानातील कलमांचे वाचन करताना प्रत्येक कलमामागील सामाजिक, राजकीय व मानवी मूल्ये सोप्या भाषेत उलगडून सांगितली.

मसंविधान हे केवळ कायद्याचे पुस्तक नसून, सामान्य माणसाच्या स्वाभिमानाचे, अधिकारांचे आणि कर्तव्यांचे संरक्षक कवच आहे,फ असे त्यांनी स्पष्ट केले. अध्यक्षस्थानी किशोर तरोणे होते. स्वागताध्यक्ष म्हणून सीमा शेंडे यांनी जबाबदारी सांभाळली. प्रमुख पाहुण्यांमध्ये युवराज तरोणे, प्रमोद खोब्रागडे, चंद्रकुमार मेश्राम, राम रतन खोब्रागडे व सरिता रामटेके यांची विशेष उपस्थिती लाभली.

सुरगाव हे अवघ्या ४० कुटुंबांचे छोटेसे गाव असले तरी या कार्यक्रमाच्या माध्यमातून एक ऐतिहासिक पाऊल उचलण्यात आले. संविधान वाचनानंतर प्रत्येक कुटुंबाच्या कुटुंबप्रमुखांच्या हस्ते संविधानाचे पुस्तक देण्यात आले. यामुळे सुरगाव हे मघरघर संविधानफ अभियानांतर्गत १०० टक्के संविधान असलेले गाव ठरले असून हा उपक्रम ग्रामीण भारतातील लोकशाही सुदृढतेचा आदर्श नमुना ठरत आहे.

### घराघरात संविधान उपक्रम लोकशाही बळकट करणारा

आजही संविधानाविषयी अज्ञान, गैरसमज व उदासीनता आढळते. अशा परिस्थितीत दुर्गम व ग्रामीण भागात संविधान थेट घराघरात पोहोचवण्याचा हा उपक्रम लोकशाही बळकट करणारा आहे. डॉ. आंबेडकर यांच्या विचारांना प्रत्यक्ष कृतीची जोड देणारा हा उपक्रम असून इतर गावांसाठीही तो प्रेरणादायी ठरेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. यशस्वी आयोजनाबद्दल डॉ. आंबेडकर राईट मीडिया वेल्फेअर असोसिएशनचे सर्वत्र कौतुक होत असून संविधानाच्या मूल्यांवर आधारित समाजनिर्मितीसाठी अशा उपक्रमांची सातत्याने गरज असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

डॉक्टर आंबेडकरराइट्स मीडिया वेल्फेअर असोसिएशनच्या माध्यमातून राबविण्यात आलेला हा कार्यक्रम फक्त सुरगावातच नव्हे तर अर्जुनी मोरगाव तालुक्यातील प्रत्येक गावात साजरा करण्यात यावा, असे मत किशोर तरोणे यांनी व्यक्त केले.

# शिवभोजन संचालक ८ महिन्यांपासून अनुदानाविना

**गोंदिया :–** राज्य शासनाने कोरोना महामारीच्या काळात सामान्य व गरजू नागरिकांना परवडणाऱ्या दरात अन्न मिळावे, या उद्देशाने शिवभोजन योजना सुरू केली होती. या योजनेच्या माध्यमातून शहरात सध्या पाच शिवभोजन केंद्रे कार्यरत असून, दररोज किमान ५०० ते ६०० नागरिक केवळ १० रुपयांत जेवणाचा लाभ घेत आहेत. लोककल्याणकारी मात्र, या योजनेची अंमलबजावणी करणाऱ्या शिवभोजन केंद्रांच्या संचालकांना मागील ८ महिन्यांपासून शासनाकडून देय असलेले अनुदान मिळाले नाही. परिणामी, लोकांची भूक भागवणारे हे संचालक आज स्वतः आर्थिक अडचणीत सापडले आहेत.

राज्य शासनाने गरजू व सामान्य नागरिकांसाठी सुरू केलेली शिवभोजन योजना आज शासनाच्या निष्काळजीपणा व उदासीनतेमुळे अडचणीत सापडली आहे. कोरोना काळात गरजूंच्या पोटाची भूक भागवण्यासाठी सुरू करण्यात आलेली ही योजना तिरोडा शहरात ५ केंद्रांद्वारे प्रभावीपणे राबवली जात आहे.

या केंद्रांमधून दररोज सुमारे ५०० ५०० ते ६०० नागरिकांना केवळ १० रुपयांत जेवण दिले जाते. मात्र,या




योजनेची अंमलबजावणी करणाऱ्या शिवभोजन संचालकांकडे शासनाने पूर्णतः दुर्लक्ष केल्याचे चित्र सध्या दिसून येत आहे. तब्बल ८ महिन्यांपासून शिवभोजन केंद्रांच्या संचालकांना शासनाकडून देय असलेले अनुदान मिळाले नाही. शासनाच्या या हलगर्जी धोरणामुळे लोकांची सेवा करणारे संचालक आर्थिक संकटात सापडले आहेत.

जेवणासाठी लागणारा कच्चा माल, गॅस सिलिंडर, वीजबिल, पाणीपट्टी तसेच कर्मचाऱ्यांचे मानधन वेळेवर देण्यासाठी संचालकांना स्वतः कर्ज काढावे लागत आहे. अनेक संचालकांनी बँक कर्ज, खासगी सावकार किंवा ओळखींच्या माध्यमातून पैसे उभे करून शिवभोजन केंद्रे सुरू ठेवली असल्याची सुरू असल्याचा दावा करत असले, तरी प्रत्यक्षात बाब समोर आली आहे. शासन केवळ योजना डोळेझाक केली जात आहे. लोककल्याणकारी योजना यशस्वी करण्याची जबाबदारी केवळ संचालकांवर टाकून शासन स्वतः जबाबदारीपासून पळ काढत असल्याची तीव्र टीका नागरिक व सामाजिक कार्यकर्त्यांकडून केली जात आहे.

वेळेवर अनुदान न देणे म्हणजे अप्रत्यक्षपणे शिवभोजन योजना बंद पाडण्याचा प्रयत्न असल्याचा आरोपही होत आहे. शिवभोजन संचालक मंडळाने शासनाकडे करण्याची मागणी केली आहे.

# आ.रहांगडालेंच्या पाठपुराव्याने एनएनटीआर व्याघ्र प्रकल्प बफर क्षेत्रात प्रशासकीय सुधारणोस मंजुरी

**गोंदिया :–** महाराष्ट्रात ६ व्याघ्र प्रकल्प असून, नवेगाव–नागझिरा व्याघ्र प्रकल्प हा भंडारा व गोंदिया जिल्ह्यात असून, प्रमुख व्याघ्र प्रकल्प आहे. याचे बफर क्षेत्र सन २०१७ मध्ये जाहीर झाले होते. राज्यातील इतर व्याघ्र प्रकल्पाच्या व्यवस्थापन संरचनेनुसार या व्याघ्रप्रकल्पाचे प्रशासकीय व्यवस्थापनाचे एकत्रीकरण झाले नसल्याने बफर क्षेत्राचे व्यवस्थापन है प्रादेशिक आणि एफडीसीएम विभागाकडे होते. यात सुधारणा करण्यासाठी बऱ्याच सुधारणा करण्याची गरज होती. त्यात सुधारणा करण्यास शासनाने आ. विजय रहांगडाले यांच्या पाठपुराव्यानंतर मंजुरी दिली आहे.

नवेगाव–नागझिरा व्याघ्र प्रकल्प क्षेत्रात राज्यातील इतर व्याघ्र प्रकल्पासारखे उपजीविका, रोजगार निर्मिती प्रकल्प अतिशय कमी प्रमाणात आहेत. मानव वन्यजीव संघर्ष वाढलेला असून, त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी उपाययोजना करण्याची गरज आहे.सध्या भंडारा व गोंदिया जिल्ह्यात अनेक मानव वन्यजीव संघर्षाच्या घटना घडत आहेत. यात वाढ होत असल्याचे समोर येत आहेत. त्यामुळे व्यवस्थापनात सुधारणा आवश्यक आहे.



**रोजगार निर्मितीत होणार वाढ**

**ताडोबा, पेंच व्याघ्र प्रकल्पाच्या बफर क्षेत्रात पर्यटन व इतर संबंधित प्रकल्पातून स्थानिकांना मोठ्या प्रमाणावर रोजगार उपलब्ध झालेला आहे. त्याचप्रमाणे येथील लोकांना रोजगार संधी पर्यटनाच्या माध्यमातून वाढवणे अपेक्षित आहे. बफर क्षेत्र तत्काळ व्याघ्र प्रकल्पाकडे देऊन नवीन पर्यटन प्रकल्प, सफारी गेट सुरू केल्यास स्थानिकांना त्याचा फायदा होऊ शकतो. काही घटक स्थानिकांना कुपकटाई, तेंदूपाने, मोहफुले यातील रोजगार बंद होण्याबाबत गैरसमज पसरवत आहेत. मात्र व्यवस्थापन सुधारणेमुळे यावर कोणतीही बंदी येत नाही. केंद्र शासन व राज्य शासनामार्फत मंजूर आराखड्यानुसार कामे सुरू राहून रोजगार निर्मिती सुरू राहिल.**

**स्थानिक नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी प्रशासनात सुधारणा व नागरिकांना रोजगार संधी वाढवण्यासाठी नवीन प्रकल्प राबविण्यात नवेगाव नागझिरा व्याघ्र प्रकल्प पुढाकार घेऊन प्रयत्न करणार आहे. त्यामुळे निश्चितच मानव वन्यजीव संघर्ष कमी होणे आणि पर्यटन संधी वाढविण्यास मदत होईल.**

**– विजय रहांगडाले, आमदार**

याबाबत संघर्ष हाताळण्यासाठी प्रशासकीय सुधारणा करून क्षेत्रीय कर्मचारी आणि अधिकारी यांची संख्या आता वाढवली जाणार आहे.

**साहाय्य वनसंरक्षक दर्जाच्या अधिकाऱ्याची नियुक्ती होणार**

वन्यप्राण्यांनी केलेल्या पीक नुकसानीची प्रकरणे, पाळीव पशुच्या जखमी किंवा मृत्यू होण्याची प्रकरणे तत्काळ मंजूर होण्यासाठी नव्याने तिरोडा, साकोली आणि नवेगावबांध या ठिकाणी सहायक वनसंरक्षक या वर्ग (अ) दर्जाच्या अधिकाऱ्यांची नेमणूक होणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना भंडारा किंवा गोंदिया येथे जाण्याची आवश्यकता पडणार नाही. तालुका स्तरावर त्यांच्या समस्येवर तोडगा काढला जाईल. यामुळे बफर क्षेत्रातील स्थानिकांना फायदाच होणार आहे.

# प्राथ.आरोग्य केंद्र चोपा येथे पुरुष नसबंदी शस्त्रक्रिया शिबिर



**गोरेगाव:–** कुटुंब नियोजनकार्यक्रमावर लक्ष केंद्रित करण्यासाठी तसेच या कार्यक्रमात पुरुषांचा सहभाग अधिक प्रयत्नशील व बळकट करण्यासाठी जिल्ह्यात यावर्षी पुरुष नसबंदी शस्त्रक्रिया पंधरवाडा २१ नोव्हेंबर ते ४ डिसेंबर २०२५ या कालावधीत राबविण्यात येत आहे. राष्ट्रीय कुटुंब कल्याण कार्यक्रमांतर्गत पुरुष नसबंदी शस्त्रक्रिया पंधरवाडानिमित्त १३ डिसेंबर रोजी गोरेगाव तालुकाच्या वतीने प्राथमिक आरोग्य केंद्र चोपा येथे भव्य पुरुष नसबंदी (बिनटाका) शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. त्यात १२ पुरुष नसबंदी शस्त्रक्रिया यशस्वी शस्त्रक्रिया पार पडली.

पुरुष नसबंदी पंधरवडा साजरा केल्याने पुरुष शस्त्रक्रिये बाबत समाजात जनजागृती होऊन पुरुष नसबंदी शस्त्रक्रियेचे प्रमाण वाढविण्यास निश्चितव मदत होणार असल्याचे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभिजीत गोल्हार यांनी म्हटले आहे.

शिबीरात तालुक्यातील पिएचसी कुर्हाडीचे ८ केसेस, पिएचसी चोपाचे २ केसेस व पिएचसी तिल्ली मोहगावे २ केसेस असे एकुण १२ पुरुषनसबंदी शस्त्रक्रिया यशस्वी पार पडले. शिबिराच्या यशस्वीतेसाठी डॉ. विनोद चव्हाण, डॉ. बि. एल. मेश्राम यांच्या चमूने सहकार्य केले. त्याच प्रमाणे डॉ. पुरुषोत्तम पटले, डॉ. विनोद चव्हाण, डॉ. बि. एल. मेश्राम, तालुका आरोग्य सहाय्यक रवि पटले यांचे सह प्राथमिक आरोग्य केंद्राचे आरोग्य सेवक, आरोग्य सेविका, आरोग्य सहाय्यक, आरोग्य सहायिका, स्टाफ नर्स व आशा सेविका यांचे सहकार्य लाभले.

**पुरुष नसबंदी (बिनटाका) शस्त्रक्रियेने पुरुषांच्या शारीरिक व मानसिक क्षमतेत कुठलाही फरक पडत नाही, कुठलाही अशक्तपणा जाणवत नाही, माणुस पुर्वी सारखाच कष्टाचे काम करु शकतो, बिन टाक्याची शस्त्रक्रिया अत्यंत कमी वेळेची शस्त्रक्रिया आहे, शस्त्रक्रिये नंतर दवाखान्यात भरती होण्याची गरज नाही लगेच डिस्चार्ज मिळतो, कमी त्रासाची कमी वेळेची व जास्त मोबदला देणारी मिळणारी शस्त्रक्रिया असल्याने पुरुषांनी आपल्या कुटुंबाच्या कल्याणासाठी पुरुष नसबंदी (बिनटाका) शस्त्रक्रिया करण्यात पुढाकार घ्यावा.**

**– डॉ. विनोद चव्हाण, तालुका आरोग्य अधिकारी गोरेगाव**

## संविधान जनजागृतीसाठी मिरवणूक



**गोंदिया:–** श्री. गणेश ग्रामीण विकास शिक्षण संस्था द्वारा गुर्जर क्षत्रिय समाज हाल रेलटोली येथे तीन दिवसीय संविधान जागर अभियान व व्यसन मुक्त पहाट २०२६ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. संविधान रॅलीचे उद्घाटन सत्यप्रकाश मेहरा यांच्या अध्यक्षतेखाली पोलिस अधीक्षक गोरख भामरे यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी प्रकाश गेडाम, रामकृष्ण चौधरी, विजय बहेकार, संजय वाहणे, सविता बेदरकर, विजय मोहबे आदी उपस्थित होते. दरम्यान जिल्हा पोलिस अधीक्षक गोरख भामरे यांनी संविधान रॅलीला हिरवी झेंडी दाखवून रॅलीला सुरुवात केली.

दरम्यान रॅली गुजराती शाळा, पाल चौक, मालधक्का, गुरुद्वारा या मार्गाने भ्रमण करीत गुर्जर क्षत्रिय समाज भवन येथे रॅलीचे समापन करण्यात आले. यावेळी ताराचंद चव्हान, संतोष वंजारी, चैतराम चौधरी व पुष्पाबाई कटरे, तसेच राधाबाई नर्सिंग स्कूल, ऐरोमिरा कॉलेज ऑफ नर्सिंग, एकवेरियस कॉलेज ऑफ नर्सिंग, सेंट्रल कॉलेज ऑफ नर्सिंग अदासी, एस.सी. गर्ल्स होस्टल व रविंद्रनाथ टेगौर हाईस्कूलचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# खेळातून शिस्त, संस्कार व नेतृत्वगुण विकसित होतात-जि.प. अध्यक्ष लायकराम भेंडारकर

**बोंडगावदेवी येथे जिल्हास्तरीय अटल क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवाचा दिमाखदार समारोप**



**अर्जुनी–मोरगाव:** – तालुक्यातील बोंडगावदेवी येथे गोंदिया जिल्हा परिषदेचे अध्यक्ष लायकराम भेंडारकर यांच्या सखोल मार्गदर्शनाखाली तसेच ग्रामवासी बंधु–भगिनींच्या भरीव सहकार्याने आयोजित जिल्हास्तरीय अटल जिल्हा क्रीडा व सांस्कृतिक महोत्सव उत्साहात, जल्लोषपूर्ण आणि शिस्तबद्ध वातावरणात यशस्वीरीत्या संपन्न झाला.

दि. २५ ते २९ डिसेंबर दरम्यान जि.प. हायस्कूल व प्राथमिक शाळेच्या विशाल पटांगणावर पार पडलेल्या या महोत्सवात जिल्ह्यातील विविध तालुक्यांतील खेळाडू व कलाकारांनी क्रीडा तसेच सांस्कृतिक स्पर्धांमध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. खेळाडूंनी दाखवलेली मेहनत, कौशल्य, संघभावना आणि उत्कृष्ट खेळाडूवृत्ती सर्वांचे लक्ष वेधून घेणारी ठरली.

महोत्सवाच्या समारोप व बक्षीस वितरण समारंभात विजयी संघ व वैयक्तिक स्पर्धकांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके, सन्मानचिन्हे व प्रमाणपत्रे प्रदान करून गौरविण्यात आले. विजेत्यांच्या चेह?यावरचा आनंद व आत्मविश्वास पाहण्यासारखा होता. यावेळी उपस्थित मान्यवरांनी सर्व विजेत्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

समारोपप्रसंगी मार्गदर्शन करताना जिल्हा परिषद अध्यक्ष लायकराम भेंडारकर म्हणाले की, ङ्गखेळामुळे केवळ शारीरिक सुदृढता वाढत नाही, तर शिस्त, संयम, नेतृत्वगुण आणि संघभावना निर्माण होते. ग्रामीण भागातील खेळाडूंना हक्काचे व्यासपीठ देणे हेच अटल क्रीडा महोत्सवाचे खरे उद्दिष्ट आहे. अशा स्पर्धांमधून उद्याचे गुणवंत खेळाडू घडतील.

तसेच स्पर्धेत सहभागी होऊनही यश न मिळालेल्या संघांना खचून न जाता जिद्द, चिकाटी आणि मेहनतीच्या जोरावर पुढील स्पर्धांमध्ये निश्चितच यश मिळेल, असा विश्वास व्यक्त करत ङ्गहार ही अपयश नसून यशाच्या दिशेने नेणारी पायरी आहे असा सकारात्मक संदेश त्यांनी दिला.




या समारंभास जि.प.अध्यक्ष लायकराम भेंडारकर, डॉ. प्रशांत पडोळे (खासदार, भंडारा–गोंदिया), राजकुमार बडोले (आमदार तथा माजी मंत्री), सुरेश हर्षे (उपाध्यक्ष जि.प.), हेमंत पटले (माजी आमदार), डॉ. लक्ष्मण भगत, पौर्णिमा ढेंगे, एम. मुरुगानंथम (मुख्य कार्यकारी अधिकारी), सभापती आम्रपाली डोंगरवार, मुशणे रहांगडाले, चित्रलेखा चौधरी, चेतन वडगाये, योगिता पुंड, संजय टेंबरे, सविता पुराम, यशवंत गणवीर, निशा तोडासे, हनवत वटी, अंजली कटरे, लक्ष्मी तरोणे, वैशाली पंधरे, उषाताई शहारे, वंदना काळे, किरण कुमार पारधी, जयश्री देशमुख, कविता रंगारी, संदीप कापगते, सुनंदा उके, चंद्रशेखर ठवरे, सरपंच प्रतिमा बोरकर,राधेश्याम झोळे,होमराज पुस्तोडे, किशोर तरोणे यांच्यासह जिल्हा परिषद व पंचायत समितीचे पदाधिकारी, माजी लोकप्रतिनिधी, शिक्षणाधिकारी, गटशिक्षणाधिकारी, विस्तार अधिकारी, शिक्षकवर्ग, विद्यार्थी–विद्यार्थिनी तसेच मोठ्या संख्येने महिला व पुरुष नागरिक उपस्थित होते.

एकूणच, ग्रामीण खेळाडू व कलाकारांना नवी दिशा देणारा हा अटल क्रीडा व सांस्कृतिक महोत्सव प्रेरणादायी ठरून यशस्वीरीत्या संपन्न झाला.


# विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर
## (महाराष्ट्र शासनाचा अंगिकृत उपक्रम)
## कार्यकारी अभियंता, उपसा सिंचन प्रकल्प विभाग, तिरोडा, तह.तिरोडा, जि.गोंदिया.

(ई मेल: eelipd-tirora@yahoo.in दुरध्वनी क्र.२५३४१६)

## ई–निविदा सुचना क्र.०९/२०२५–२६

main portal://https://mahatenders.gov.in

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, उपसा सिंचन प्रकल्प विभाग, तिरोडा तह.तिरोडा जि.गोंदिया, जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन ह्यांचे कार्यालयाकडून खालील कामाकरिता सक्षम असलेल्या कंत्राटदाराकडून ब–१ नमुन्यातील ई–निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागविण्यात येत आहे. निविदा कागदपत्र शासनाच्या http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावे. सविस्तर निविदा सुचना व ई निविदेबाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सुचना फलकावर उपलब्ध आहे.

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, उपसा सिंचन प्रकल्प विभाग, तिरोडा तह.तिरोडा जि.गोंदिया यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्र. | कामाचे नाव | कामाची निविदा रक्कम | बयाना रक्कम | कोऱ्या निविदेची रक्कम | कंत्राटदाराचा वर्ग | काग पूर्ण करण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | भुराटोला लघु पाटबंधारे प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रातील मौजा भुराटोला ते जमुनिया जाणारी पांदण रस्त्याचे काम. | रू.१०.९२ लक्ष | रू. ११,०००/– | रू.२,०००/– जीएसटी १८% Rs.३६०/–= रू.२,३६०/– | मजुर सहकारी संस्था फक्त गोंदिया जिल्हा | ६ महिने पावसाळा कालावधी धरुन |
| २. | भुराटोला लघु पाटबंधारे प्रकल्पाअंतर्गत Cross Drain वर HPC तसेच Approach रस्त्याची दुरुस्तीची काम. | रू.११.४२ लक्ष | रू. १२,०००/– | रु.२,०००/– जीएसटी १८% Rs.३६०/–= रू.२,३६०/– | मजुर सहकारी संस्था फक्त गोंदिया जिल्हा | ६ महिने पावसाळा कालावधी धरुन |
| ३. | भुराटोला लघु पाटबंधारे प्रकल्पाच्या शीर्ष विमोचकाच्या U/S व D/S बाजूला Staircase व Parapet Wall चे बांधकाम | रू.११.९५ लक्ष | रू. १२,०००/– | रू.२,०००/– जीएसटी १८% Rs.३६०/–= रू.२,३६०/– | मजुर सहकारी संस्था फक्त गोंदिया जिल्हा | ६ महिने पावसाळा कालावधी धरुन |

| | | |
|---|---|---|
| अ) ई–निविदा उपलब्ध कालावधी | :– | दि.०१/०१/२०२६ सकाळी ११.०० ते ०८/०१/२०२६ वेळ १७.४५ वाजता पर्यंत |
| ब) ई–निविदा सादर करण्याचा अंतिम कालावधी | :– | दि.०८/०१/२०२६ वेळ १७.४५ वाजता पर्यंत |
| क) निविदा पूर्व बैठक | :– | लागु नाही. |
| ड) निविदा उघडणे (तांत्रिक लिफाफा) | :– | दिनांक १२/०१/२०२६ (वेळ दुपारी १२.३० वाजता) |

(सदर निविदे सुचनेत काही बदल होत होत असल्यास फक्त वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल)

१) सदर कामाकरीता पश्चात अर्हता (Post Qualification) लागू नाही.

२) कार्यकारी अभियंता कार्यालयातून ई–निविदा कोरे प्रपत्रे विकली जाणार नाहीत.

३) सविस्तर ई–निविदा सुचना महाराष्ट्र शासनाच्या इलेक्ट्रानिक टेन्डर managementhttp://mahatenders.gov.in वर तसेच कार्यकारी अभियंता कार्यालयातील नोटीसबोर्डवर पहावयास मिळेल.

४) या कामाचे अंदाजपत्रक, दर, विश्लेषण, मोजमापे नकाश इ. कार्यकारी अभियंता यांच्या कार्यालयात उपलब्ध आहे. निविदाकार प्रत्यक्ष कार्यक्षेत्र परिस्थितीनुसार दर भरण्यास जबाबदार राहतील आणि याकरिता कोणताही प्रकारचे दावे निविदाकारास देय राहणार नाही.

**जावक क्र./२५०६/निली/२०२५**
**दि.२२/१२/२०२५**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय**
**उपसा सिंचन प्रकल्प विभाग,तिरोडा**

**(श्री.वि.मस्कावार,)**
**कार्यकारी अभियंता,**
**उपसा सिंचन प्रकल्प विभाग,**
**तिरोडा**

जिम/का/गों/जाहि/७८/२०२५

# ६० महाविद्यालयांचे लाभ घेणारे ते १९ हजार ७४३ विद्यार्थी कोण?

## १६ हजार पुस्तकांच्या वाटपावर प्रश्नचिन्ह : माहिती अधिकाराअंतर्गत उघड

**गोंदिया:-** येथील जिल्हा क्रीडा विभागातील अनागोंदी कारभाराचे मोठे घबाड माहितीच्या अधिकाराअंतर्गत मागविलेल्या माहितीत पुढे आले आहे. प्रशिक्षण व संपूर्ण करिअर मार्गदर्शन पुस्तकाचे वितरण मोजक्याच महाविद्यालयांना करण्यात आल्याचे ६० पुढे आहे. त्यामुळे महाविद्यालयांतील लाभ घेणारे ते १९,७४३ विद्यार्थी कोण, १६ हजार पुस्तके कोणाला वाटप करण्यात आली व दोन महिन्यांचे ऑनलाइन प्रशिक्षण घेणारे १६०० विद्यार्थी कोण? असे अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत.

जिल्हा क्रीडा विभागाद्वारे शासनाच्या नावीन्यपूर्ण योजनेत मोठा गैरप्रकार झाल्याचे जिल्ह्यातील विविध महाविद्यालयातून माहिती अधिकार अधिनियम अंतर्गत प्राप्त माहितीवरून उघड झाले आहे. विशेष प्रशिक्षण न देताच अभ्यास साहित्य संच लाभार्थ्यांना वाटप करण्यात आल्याची बाब उघडकीस आली आहे. पात्र लाभार्थ्यांना प्रशिक्षण साहित्य वाटप करण्यासाठी पुण्यातील एका अकॅडमीची निवड ई-टेंडर करून त्यात घोळ केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. येथील जिल्हा क्रीडा कार्यालयातर्फे मोफत प्रशिक्षण व साहित्य वाटप करण्यासाठी जिल्हा व क्रीडा अधिकाऱ्याने डीपीडीसीच्या माध्यमातून संस्थेचे संचालकाला १ कोटी रुपयांचा निधी दिल्याची बाब प्राप्त माहितीवरून समोर आली आहे. जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत नावीन्यपूर्ण योजनेतून जिल्ह्यामध्ये स्पर्धा परीक्षा ऑनलाइन प्रशिक्षण व आवश्यक अभ्यास साहित्य इच्छुक व पात्र विद्यार्थ्यांना पुरविण्याची योजना जिल्हा क्रीडा विभागाने सन २०२३-२४ वर्षासाठी फक्त कागदावरच राबविली. यासाठी पुण्यातील सह्याद्री आयएएस अकॅडमीची निवड करण्यात आली. जिल्हा क्रीडा विभागाच्या प्रस्तावानुसार निवड झालेल्या विद्यार्थ्यांना मराठी माध्यमातून एमपीएससी, यूपीएससीचे आठ महिन्याचे आभासी प्रशिक्षणासाठी पदवी किंवा पदवीच्या अंतिम वर्षातील ५०१ विद्यार्थी कला, वाणिज्य, विज्ञान शाखेतून प्रत्येकी १६७ विद्यार्थ्यांची गुणवत्तेच्या आधारावर निवड करून एमपीएससी, यूपीएससीचे प्रशिक्षण देणे अपेक्षित होते. पात्र विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले नसल्याचे माहिती अधिकार अंतर्गत मागितलेल्या माहितीत उघड झाले आहे. तसेच सरळसेवा भरतीची तयारी करणाऱ्या जिल्ह्यातील १५०० विद्यार्थ्यांना पाच हजार रुपये किमतीचा संच मोफत वाटप करणे अपेक्षित होते.

यासाठी शासनाकडून ७५ लक्ष निधी देण्यात आला. परंतु, विद्यार्थ्यांना हे संच वाटप न करता संबंधित महाविद्यालयाच्या ग्रंथालयाकडे अभ्यास साहित्य संच देण्यात आल्याची माहिती आहे.

जिल्हा नियोजन समितीच्या नावीन्यपूर्ण निधीमधून तिन्ही उपक्रमांसाठी १ कोटी २५ लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला. यासाठी ई-निविदेच्या माध्यमातून एका संस्थेची निवड करण्यात आली. या संस्थेने संस्थेने अटी, शर्ती व सादर प्रस्तावानुसार उपक्रम न राबवताच सव्वाकोटीच्या निधीवर डल्ला मारल्याचे पुढे आले आहे. त्यामुळे याची सखोल चौकशी केल्यास बरीच धक्कादायक माहिती पुढे येण्याची शक्यता नाकारता येत नाही.

जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत क्रीडा अधिकारी कार्यालय गोंदियातर्फे २०२२-२३ या वर्षात राबविण्यात आलेल्या नावीन्यपूर्ण योजनेत १ कोटी रुपयांचा घोळ झाल्याचे पुढे आले. तर सन २०२४-२५ या वर्षातही १.२५ कोटीचा गैरप्रकार झाल्याचे माहिती अधिकार कायद्याअंतर्गत प्राप्त माहितीतून पुढे आले आहे. राज्याच्या युवा धोरणात प्राधान्य बींमध्ये स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन विषयाचा अंतर्भाव करण्यात आला आहे. युवा धोरणाअंतर्गत युवकांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करणे अपेक्षित आहे.

जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय

### प्रत्यक्ष महाविद्यालयात जाऊन करायचे होते मार्गदर्शन

**यासाठी जिल्ह्यातील आठही तालुक्यांमध्ये ६० महाविद्यालयांत प्रत्यक्ष जाऊन १९,७४३ विद्यार्थ्यांना तज्ज्ञ मार्गदर्शकाद्वारे स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, तज्ज्ञ डॉक्टरांद्वारे आरोग्य विषयक, कायदेतज्ज्ञाद्वारे कायदेविषयक मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करायचे होते. यासाठी प्रतिलाभार्थी २२७.९२ रुपये असे ४५ लक्ष रुपये मंजूर करण्यात आले होते. तर प्रतितालुका दोन हजार याप्रमाणे १६०० विद्यार्थ्यांना १० वी १२ वी व पदवीनंतर काय? या ३०० रुपये किमतीच्या संपूर्ण करियर मार्गदर्शन पुस्तकाचे वितरण करणे होते. यासाठी ४८ लक्ष रुपये मंजूर करण्यात आले होते.**

### संस्थेने केली पूर्ण निधीची उचल

**जिल्हा नियोजन समितीच्या नावीन्यपूर्ण निधीमधून तिन्ही उपक्रमांसाठी १.२५ कोटी निधी उपलब्ध करून देण्यात आला. यासाठी ई-निविदेच्या माध्यमातून एका संस्थेची निवड करण्यात आली. या संस्थेने संस्थेने अटी, शर्ती व सादर प्रस्तावानुसार उपक्रम न राबविताच निधीची उचल केल्याचे पुढे आले आहे. त्यामुळे याची सखोल चौकशी केल्यास यात नेमके कोण कोण सहभागी आहेत, तसेच यातील मोठा घोटाळा उघडकीस येण्याची शक्यता नाकारता येत नाही.**

या यंत्रणेने नावीन्यपूर्ण व व योजनेतून गोंदिया जिल्ह्यातील आठही तालुक्यांमध्ये होतकरू विद्यार्थ्यांसाठी तालुका महाविद्यालयनिहाय मोफत स्पर्धा परीक्षा कार्यशाळा, रोजगारभिमुख प्रशिक्षण, तसेच तरुणांना तज्ज्ञ मार्गदर्शकाद्वारे अभ्यास कसा करायचा आरोग्यविषयक मार्गदर्शन कार्यशाळा आयोजित करण्यासह करिअर मार्गदर्शन पुस्तकाचे वाटप करणे, विद्यार्थ्यांच्या कल्याणासाठी त्यांना जागरूक करणे व त्यांचा व्यक्तिमत्त्व विकास करण्यासाठी स्पोकन इंग्रजी व संभाषण कौशल्य, सीव्ही तयार करणे, एमएस ऑफिस (पॉवर पॉइंट, एमएसवर्ड, एमएस एक्सल आदी) हाताळणे, तसेच मुलाखतीचे ऑनलाइन प्रशिक्षण देणे होते.

# भयातून विकासाकडे गडचिरोलीची वाटचाल-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**गडचिरोली:-** गडचिरोली पोलीस दलाने गेल्या काही वर्षांत दाखविलेल्या शौर्यामुळे आज गडचिरोलीत भयाचे नव्हे तर विकासाचे, जनतेचे आणि संविधानाचे राज्य प्रस्थापित झाले आहे. या परिवर्तनाची साक्ष म्हणून गडचिरोली महोत्सव सुरू झाला असून, तो जिल्ह्यातील नागरिकांसाठी हक्काचा, अभिव्यक्तीचा आणि सहभागाचा मंच ठरत आहे. कला, क्रीडा, लोकप्रबोधन, नृत्य, गायन आणि मनोरंजन यांच्या माध्यमातून समाजजागृती व सांस्कृतिक एकात्मता साधली जात असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.



गडचिरोली पोलीस विभागाच्या पुढाकाराने आयोजित गडचिरोली महोत्सव या सांस्कृतिक कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. यावेळी वित्त, नियोजन, कृषी, मदत व पुनर्वसन, विधी व न्याय, कामगार राज्यमंत्री तथा गडचिरोलीचे सहपालकमंत्री आशिष जयस्वाल, गृह (ग्रामीण), गृहनिर्माण, शालेय शिक्षण, सहकार, खनिकर्म राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, अपर पोलीस महासंचालक (विशेष कृती) छेरींग दोरजे, नक्षलविरोधी अभियानाचे विशेष पोलिस महानिरीक्षक संदीप पाटील, जिल्हाधिकारी अविश्यांत पंडा, जिल्हा पोलीस अधीक्षक निलोत्पल, आमदार धर्मरावबाबा आत्राम, आमदार डॉ. मिलिंद नरोटे, गोंडवाना विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे, तसेच लॉयड्स मेटल्स ॲण्ड एनर्जी लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक बालसुब्रमण्यम प्रभाकरन यांची प्रमुख उपस्थिती होती.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी गडचिरोली पोलीस दलाने एकीकडे माओवादाविरोधात निर्णायक लढा देत जिल्ह्याला जवळपास पूर्णपणे मुक्त केले, तर दुसरीकडे लोकाभिमुखतेतून महसूल प्रशासनासोबत समन्वय साधत राज्य शासनाच्या विविध योजना जिल्ह्याच्या कानाकोपऱ्यापर्यंत पोहोचवल्या, असे सांगितले.

"आज गडचिरोली जिल्ह्याने भरारी घेतली आहे. शिक्षण, आरोग्य, रोजगार, उद्योग, पर्यावरण अशा प्रत्येक क्षेत्रात जिल्ह्याची झपाट्याने प्रगती होत आहे. पुढील दहा वर्षांत गडचिरोली महाराष्ट्रातील पहिल्या पाच जिल्ह्यांत असेल," असा विश्वास व्यक्त करत, आगामी काळात दक्षिण भारताचे प्रवेशद्वार म्हणून गडचिरोलीला विकसित करण्यासाठी महाराष्ट्र शासन कटिबद्ध असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले.

यावेळी सांस्कृती कार्यक्रमात विजेत्यात स्पर्धकांना मुख्यमंत्री यांच्या हस्ते गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा पोलिस अधिक्षक श्री निलोत्पन यांनी केले.यावेळी विविध लोकप्रतिनिधी, अधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# धापेवाडा सिंचन योजनेची कामे वेळेत पूर्ण करा-आ.विजय रहांगडाले

**तिरोडा :-** तालुक्यातील शेतकऱ्यांना सुजलाम सुफलाम होण्यासाठी महत्त्वपूर्ण असणाऱ्या धापेवाडा उपसा सिंचन योजना टप्पा क्र.१ व २ यशस्वीरीत्या पूर्ण करण्यात आली आहे. आ. विजय रहांगडाले हे दर दोन महिन्यांत आढावा बैठक घेऊन या योजनेच्या कामाचा पाठपुरावा शासनाकडे करतात. याच अनुषंगाने शुक्रवारी (दि. २६) धापेवाडा उपसा सिंचन योजनेच्या कार्यालयात बैठक घेऊन विभागाच्या अधिकाऱ्यांकडून आढावा घेऊन योजनेची कामे वेळेत पूर्ण करण्यास सांगितले.

धापेवाडा उपसा सिंचन योजना टप्पा-२ ही गोंदिया जिल्ह्यातील तिरोडा तालुक्यामधील कवलेवाडा गावाजवळ बांधण्यात आली आहे. या योजनेद्वारे गोंदिया जिल्ह्यातील ८०७८६ हेक्टर व भंडारा जिल्ह्यातील ९४२० हेक्टर अशा दोन्ही जिल्ह्यांतील एकूण ९०१४६ हे. सिंचन क्षमता निर्माण होणार आहे. वैनगंगा नदीवर ४१३ मी लांब, २३ दरवाजे असलेल्या ४४.०५ दलघमी (१.५६ टीएमसी) क्षमतेच्या बॅरेजचे बांधकाम पूर्ण झाले आहे.

या बॅरेजवरील पुलामुळे भंडारा व गोंदिया जिल्हे जोडले गेले आहेत. तसेच तिरोडा, तुमसर या शहरांची व इतर लहान गावांच्या पिण्याच्या पाण्याची व्यवस्था झाली आहे. टप्पा २ ची कामे सुरू आहेत. पंपगृहातील एकूण ८ पंपाद्वारे पाणी उपसा करून बोदलकसा व चोरखमारा तलावामध्ये भरण्यात येणार असून त्यापैकी ५ पंपांची उभारणी करण्यात आली आहे.

बोदलकसा उर्ध्वनलिकेद्वारे बोदलकसा तलावामध्ये व सर्रा उर्ध्वनलिकेद्वारे चोरखमारा तलावामध्ये पाणी सोडण्यात आले आहे. प्रकल्पाच्या चरण-३ चे काम करतेवेळी उर्वरित ३ पंपाची उभारणी करण्यात येणार असल्याची माहिती बैठकीत दिली.



### या विषयावर बैठकीत चर्चा

**०१८.२२ हे. वन जमीन संपादनाकरिता बाह्य अभिकरण नेमणुकीच्या कामाची निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती. परंतु, ही निविदा रद्द करून आता प्रकल्पाच्या सु. प्र. मा. अहवालानुसार प्रकल्पाला लागणारी एकूण ११०.७४ हे. वन जमीन संपादनाकरिता बाह्य अभिकरण नेमणुकीची कार्यवाही करणे. प्रकल्पाचे टप्पा ३ चे कामे हाती घेण्याकरिता सविस्तर सर्वेक्षण करणे आवश्यक आहे.**

### भूस्तर सर्वेक्षण पूर्ण

**बोदलकसा पंपगृहाकरिता व वनजमिनीच्या हद्दीपर्यंत बोदलकसा ते मगेझरी उर्ध्वनलिकाचे भुस्तर सर्वेक्षण झाले आहे. आता सदर बोदलकसा पंपगृहाकरिता संकल्पना प्रस्ताव सीडीओ नाशिक येते पाठविण्याकरिता चरण-३ चे लाभक्षेत्र अंतिम करणे. याबाबत बैठक घेण्यात आली. या बैठकीला कार्यकारी अभियंता श्रीकांत मस्कावार, जि. प. सदस्य चत्रभूज बिसेन, मुकेश भगत व यंत्रणेचे सर्व अधिकारी उपस्थित होते.**



# ग्रा.पं.निंबा येथे महिलांसाठी एचबी शिबिराचे आयोजन

**गोरेगाव :-** तालुक्यातील निंबा ग्रामपंचायत येथे महिलांचे आरोग्य संवर्धनाच्या उद्देशाने एचबी हिमोग्लोबिन तपासणी कॅम्प सरपंच वर्षा विजय पटले यांचे अध्यक्षतेखाली गुरुवारी (दि.२५) आयोजित करण्यात आले होते. या कॅम्पमध्ये महिलांची हिमोग्लोबिन तपासणी करून त्यांना आरोग्य विषयी मार्गदर्शन करण्यात आले.



कमी एचबी हिमोग्लोबिन असलेल्या महिलांना योग्य आहार, औषध उपचार व पुढील उपचाराबाबत माहिती देण्यात आली. महिलांमध्ये रक्तकल्पता कमी व्हावी व आरोग्याबाबत जागरूकता निर्माण व्हावी हा या उपक्रमाच्या मुख्य उद्देश आहे असे सरपंच वर्षा विजय पटले यांनी सांगितले. या उपक्रमासाठी आरोग्य विभागाचे कर्मचारी, आरोग्य सेविका प्रेरणा शिवणकर, विष्णू घुगे, संजू मेश्राम, पुष्पा भेंडारकर, अंगणवाडी सेविका, आशा सेविका, मदतनीस व कृषी सखी व गावकरी उपस्थित होते.

# नवेगाव नागझिरा व्याघ्र राखीव प्रकल्प क्षेत्र एकसंध

नवेगावबांध :- नवेगाव-नागझिरा व्याघ्र राखीव क्षेत्र एकसंध करण्याचा महाराष्ट्र शासनाचा निर्णय ग्रामीण जनतेसाठी दिलासादायक ठरणार की शेतीप्रधान जीवनावर निर्बंध आणणारा यावर संमिश्र प्रतिक्रिया उमटत आहेत. महसूल व वन विभागाच्या २४ डिसेंबर २०२५ रोजीच्या शासन निर्णयानुसार नवेगाव राष्ट्रीय उद्यान, नागझिरा वन्यजीव अभयारण्य व लगतचा परिसर एकाच प्रशासकीय नियंत्रणाखाली आला आहे. आणण्यात या भागातील बहुतांश नागरिकांचा मुख्य व्यवसाय शेती व पशुपालन असून, त्यास जोडधंद्यांवरच ग्रामीण अर्थव्यवस्था अवलंबून आहे. त्यामुळे या निर्णयाचा थेट परिणाम सर्वसामान्य शेतकरी व ग्रामस्थांवर होणार असल्याने सकारात्मक व नकारात्मक अशा दोन्ही बाजूंनी चर्चा सुरू झाली आहे. एकसंध नियंत्रणामुळे कोअर व बफर झोनमधील नियम अधिक कडक होतील अशी शेतकऱ्यांमध्ये भीती आहे. शेतावरील तार कुंपण, विहीर, शेततळे, घरकूल, रस्ते व इतर विकासकामांसाठी वन विभागाच्या परवानग्या आवश्यक ठरल्यास शेती व ग्रामीण विकासावर मर्यादा येण्याची शक्यता आहे.

या शासन निर्णयामुळे शेतकरी व ग्रामीण जनतेच्या अधिकारांवर मोठी बंधने येणार आहेत. शेतीसाठी आवश्यक असलेली कामे करण्यासाठीही वन विभागाच्या परवानग्यांवर अवलंबून राहावे लागणार आहे. त्यामुळे वनसंवर्धनाच्या नावाखाली हा निर्णय शेतकऱ्यांसाठी बाधक ठरण्याची शक्यता अधिक आहे.



**व्याघ्र प्रकल्पातील बफर क्षेत्रात राहणारे सामान्य नागरिक, शेतकरी, तसेच वनाधारित उपजीविका करणाऱ्या लोकांच्या जनभावनांचा सन्मान राखूनच या विषयावर पुढील निर्णय घ्यावेत. यासाठी ग्रामसभेत या विषयावर सविस्तर चर्चा करून त्याचे ठराव घ्यावेत. तसेच, वन विभागातील दोन्ही संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी, राज्याचे वनमंत्री व शासन यांनी प्रत्यक्ष क्षेत्रात काय केले जाणार आहे, काय केले जाणार नाही, याची माहिती द्यावी. एकूणच स्थानिक जनतेच्या भावना केंद्रस्थानी ठेवून त्यांना विश्वासात घेऊनच नवेगाव नागझिरा व्याघ्र प्रकल्पाशी संबंधित योजना राबविण्यात याव्या.**

**- राजकुमार बडोले, आमदार**

# भजीयापारच्या सरपंच ठाकरे यांचा दिल्ली येथे सत्कार

**आमगाव:-** क्वालिटी ऑन्सिल ऑफ इंडिया व सरपंच संवाद यांच्या संयुक्त विद्यमाने राजधानी दिल्ली येथे १६ ते १९ डिसेंबरदरम्यान आयोजित मसरपंच शक्तीफ या राष्ट्रीय स्तरावरील प्रशिक्षणात देशातील विविध राज्यांतील ४८ सरपंचांनी सहभाग घेतला होता. यात आमगाव तालुक्याच्या ग्राम भजीयापार येथील सरपंच रुख्मिणी विठ्ठलप्रसाद ठाकरे यांनी सहभाग घेतला.





चार दिवस चाललेल्या या प्रशिक्षणात देशातील विविध राज्यांतील ४८ सरपंचांनी सहभाग घेतला होता. महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधित्व करत जिल्ह्यातील ग्राम भजीयापार ग्रामपंचायतीस या महत्त्वपूर्ण राष्ट्रीय मंचावर नेतृत्वाची संधी मिळाली. या प्रशिक्षणादरम्यान रुख्मिणी ठाकरे यांना त्यांच्या कार्यक्षमता नेतृत्वगुणांच्या आधारे मधुरंधर सरपंचफ हा विशेष सन्मान देण्यात आला. तसेच प्रेझेंटेशन सत्रात त्यांच्या चमूच्या कार्याची दखल घेत विशेष गौरव करण्यात आला. कार्यक्रमात लोकसभा सदस्य व केंद्रीय क्रीडामंत्री रक्षा खडसे यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या विचारांतून नेतृत्व, शिस्त, जबाबदारी आणि विकासाभिमुख प्रशासनाबाबत उपस्थित सरपंचांना प्रेरणा मिळाली. प्रशिक्षणात नेतृत्व कौशल्य, प्रशासकीय कार्यपद्धती, ग्रामविकास योजना, सुशासन, महिला सक्षमीकरण आदी विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. हा उपक्रम केवळ ज्ञानवर्धकच नव्हे, तर व्यक्तिमत्त्व विकास व नेतृत्व क्षमता अधिक बळकट करणारा ठरला. या प्रशिक्षणातून मिळालेल्या नव्या ऊर्जेच्या, स्पष्ट दिशेच्या व आत्मविश्वासाच्या बळावर ग्रामपंचायत भजीयापारच्या सर्वांगीण विकासासाठी अधिक प्रभावीपणे कार्य करण्याचा संकल्प सरपंच रुख्मिणी ठाकरे यांनी व्यक्त केला.

# सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांसाठी सुवर्णसंधी

**गोंदिया :-** सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून सोडती पद्धतीने (Lottery System) कामांचे वाटप करण्यात येणार असून, यासाठी काम वाटप समितीची बैठक आयोजित करण्यात आली आहे.शुक्रवार, दिनांक ०९ जानेवारी २०२६ रोजी दुपारी १.०० वाजता कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. १, गोंदिया यांच्या कार्यालय परिसरात आयोजित करण्यात आली आहे. इच्छुक सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांनी या बैठकीस उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

काम वाटपासाठी अर्ज करणाऱ्या अभियंत्यांनी अर्जासोबत पंजियन सेवा योजना कार्यालयात नोंदणी असल्याची झेरॉक्स प्रत तसेच यापूर्वी मिळालेली सर्व कामे पूर्ण केल्याबाबत संबंधित कार्यकारी अभियंत्यांनी दिलेले काम पूर्णता प्रमाणपत्र जोडणे अनिवार्य आहे.इच्छुक सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांकडून दिनांक २९ डिसेंबर २०२५ ते ०५ जानेवारी २०२६ या कालावधीत अर्ज स्वीकारण्यात येणार असून, त्यानंतर प्राप्त होणाऱ्या अर्जांचा विचार केला जाणार नाही.सोडतीद्वारे देण्यात येणाऱ्या कामांची यादी दिनांक २९ डिसेंबर २०२५ रोजी अधिकृत वेबसाइटवर प्रकाशित करण्यात येणार आहे. तरी संबंधित सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांनी या संधीची नोंद घ्यावी व दिलेल्या कालावधीत अर्ज सादर करावेत, असे आवाहन सार्वजनिक बांधकाम विभागाकडून करण्यात आले आहे.

# लोहारा ठरले 'ॲनिमियामुक्त गाव'

## जिल्ह्याला दिली नवी दिशा,आरोग्य व ग्रामपंचायतचा संयुक्त उपक्रम : सामाजिक उपक्रमांवर गावकऱ्यांचा भर





### निसर्गसंपन्न व सामाजिकदृष्ट्या प्रगत गाव

**लोहारा गाव निसर्ग सौंदर्याने नटलेले असून सामाजिक समतेसाठीही ओळखले जाते. येथे जातीय भेदभावाला थारा नाही. सर्व गावकरी एकत्रित गुण्यागोविंदाने राहतात. वारकरी संप्रदायाची परंपरा, एकत्र कीर्तन, सण-उत्सवांतील सामूहिक सहभाग ही गावाची खास ओळख आहे.**

### शाळा झाली डिजिटल, भिंती झाल्या बोलक्या

**गावातील जिल्हा परिषद शाळा डिजिटल करण्यात आली असून शाळेच्या भिंतींवर समाजोपयोगी संदेश व आरोग्यविषयक माहिती चित्ररूपात साकारण्यात आली आहे. यामुळे बालवयापासूनच आरोग्य व स्वच्छतेचे संस्कार विद्यार्थ्यांमध्ये रुजत आहेत.**

**गोंदिया :-** गारियाबंद जंगल व नागझिरा अभयारण्याच्या सीमेलगत वसलेले तालुक्यातील लोहारा गाव आज ॲनिमियामुक्त गात म्हणून संपूर्ण जिल्ह्यात आदर्श ठरत आहे. विशेष म्हणजे गावातील एकाही महिलेला ॲनिमिया नसणे ही बाब आरोग्य क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी मानली जात आहे. ग्रामपंचायत, आरोग्य विभाग, अंगणवाडी सेविका, आशा वर्कर आणि ग्रामस्थांच्या संयुक्त प्रयत्नातून हे यश साध्य झाले आहे.

मुख्यमंत्री समृद्ध ग्रामपंचायत अभियानात सहभागी असलेल्या लोहारा गावाने आरोग्य, स्वच्छता आणि जनजागृतीच्या माध्यमातून महिलांच्या आरोग्यावर विशेष भर दिला. नियमित आरोग्य तपासण्या, हिमोग्लोबिन तपासणी, आहारविषयक मार्गदर्शन व औषधोपचार यांच्या प्रभावी अंमलबजावणीमुळे गावाने हा टप्पा गाठला आहे. गावातील महिला व किशोरवयीन मुलींसाठी वेळोवेळी आरोग्य शिबिरे घेण्यात आली. संतुलित आहार, लोहयुक्त आहाराचे महत्त्व, स्वच्छता व आरोग्याबाबत जनजागृती करण्यात आली. यामुळे महिलांमध्ये आरोग्याविषयी जागरूकता वाढली आणि ॲनिमियावर प्रभावी नियंत्रण मिळवता आले.

ग्राम पंचायत लोह पं. स. जि.प. मीडिया या गावातील भिंती बोलक्या झाल्या असून शाळेच्या रंगवलेल्या भिंती ह्या गावकऱ्यांना सद्विचारंची प्रेरणा देतात. तंबाखूमुक्त शाळा ही संकल्पना राबविण्यात आली. गावाच्या विकासासाठी सरपंच जितेंद्र ढेकवार, ग्राम विकास अधिकारी रामेश्वर जमईवार, उपसरपंच दिलीपकुमार उके, सदस्य अश्विनकुमार बोरकर, देवेंद्र मोहमारे, भुमेश पटले, सुकवंता बिसेन, ज्योती सिंदखोपडे, अनिता बनकर, ललिता परतेती, कल्पना नागरिकर, कर्मचारी भाऊलाल कटंगकार, पंकजकुमार मस्करे, पुनाप्रसाद लिल्हारे यांचे प्रयत्न सुरू आहेत.





### ४५ जणांची व्यसनमुक्तीची शपथ

**१७ सप्टेंबर २०२५ रोजी ग्रामसभेत एकमताने ठराव घेऊन गावाला व्यसनमुक्त करण्याचा संकल्प घेण्यात आला. गावात व्यसन करणाऱ्या तब्बल ४५ व्यसनाधीन व्यक्तींनी दारू न पिण्याची शपथ घेतली. लोहारा हे शंभर टक्के व्यसनमुक्त गाव ठरले असून व्यसनमुक्तीसोबतच आरोग्यसंपन्न समाजनिर्मितीकडे गावाची वाटचाल सुरू आहे.**

### आठवड्यातून दोन दिवस गावासाठी

**गावकऱ्यांनी लोकसभागातून ग्राम स्वच्छता अभियान राबवितात. आठवड्याच्या शनिवारी व रविवार हे दोन दिवस गावासाठी नागरिक स्वप्रेरणेने देत असून ज्यांना ज्या दिवशी जमेल त्या दिवशी आठवड्यातून एक दिवस गावासाठी लोक स्वयंप्रेरणेने देत असतात. गावातील रस्ते नाल्यांची सफाई करून गावाचे आरोग्य चांगले ठेवण्यासाठी सर्वांचाच वाटा असतो.**

# १ कोटी १३ लाखाचा धान बोनस घोटाळ्याप्रकरणी २८ जणावंर गुन्हा दाखल

**गोंदिया :-** पुर्व विदर्भातील गोंदिया, भंडारा, गडचिरोली, चंद्रपूर, नागपूर या जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात धान उत्पादक शेतकरी आहेत. अशातच राईस मिल व त्यापासून आधारित उद्योगही जिल्ह्यात कार्यरत आहेत. मात्र धान खरेदी केंद्रापासून ते राईस मिल चालकांपर्यंतचे साटेलोटे हे सर्वश्रुत आहेत. अशातच सालेकसा तालुक्यातील धान खरेदी सावडा गोंधळ उजागर झाला असून या प्रकरणी २८ संचालकांविरुद्ध गुन्हा दाखल झाल्याने एकच खळबळ उडाली आहे. परिणामी यात १ कोटी १४ लाखाचा अपहार झाल्याचे समोर आले आहे.

सविस्तर असे की, शासनाकडून धान उत्पादक शेतकऱ्यांना दिल्या जाणाऱ्या बोनसचा बोगस शेतकऱ्यांच्या नावावर व अकृषक जमीन कृषक दाखवून व त्याची दुसऱ्याच शेतकऱ्यांच्या नावावर उचल करून देऊन शासनाची १ कोटी १३ लाख ८६ हजार रुपयांची फसवणूक केली. याप्रकरणी सालेकसा तालुक्यातील तीन धान खरेदी संस्थेच्या एकूण २८ संचालकांवर २४ डिसेंबर रोजी फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात

### सालेकसा तालुक्यातील प्रकार



आला आहे. त्यानंतर शासनाने १५ दिवसांपूर्वी याची चौकशी करून गुन्हे दाखल करण्याचे आदेश दिले होते. सालेकसा तालुक्यातील मानव बहुउद्देशीय सहकारी संस्था मर्यादित रामाटोला पांढरी र.जि.१११० केंद्र पाडुडदौना संस्थेचे पदाधिकारी व संचालक मंडळ आरोपी क्र.१ ते ७ यांनी संगनमत करून सरकारी गटाची नोंदणी अकृषक गटाची नोंदणी मूळ शेतकऱ्याच्या गटांची नोंदणी दुसऱ्या शेतकऱ्यांच्या नावाने नोंदविणे, मूळ शेतकऱ्यांच्या वारसदाराच्या नावाची नोंदणी करणे व अशा प्रकारच्या जमिनीची नोंदणी करून तिसऱ्याच्या खात्यावर प्रोत्साहनपर रक्कम ६३ लाख ७५ हजार २०० रुपयांची उचल करून शासनाची फसवणूक केली. तर सालेकसा सहकारी भात गिरणी संस्था मर्या. सालेकसा र.जि.११३ केंद्र कोटजभोरा संस्थेचे पदाधिकारी व संचालक मंडळ आरोपी क्र. ८ ते १७ यांनीसुद्धा अशा प्रकारे नोंदणी करून ३० लाख ५६ हजार ६०० रुपयांची उचल करून शासनाची फसवणूक केली. तसेच कावेरी शेती साधनसामग्री सहकारी संस्था मर्या. बाम्हणी र.जि.१०९७ केंद्र गिरोला संस्थेचे पदाधिकारी व संचालक मंडळ आरोपी क्र. १८ ते २८ यांनी संगनमत करून अशाच प्रकारे प्रोत्साहनपर राशी १९ लाख ५५ हजार २०० रुपयांची उचल करून शासनाची फसवणूक केली आहे. या तिन्ही संस्थांचे पदाधिकारी व संचालक मंडळ आरोपी क्र. १ ते २८ यांनी शासनाची १ कोटी १३ लाख ८६,००० रुपयांची फसवणूक केली. याप्रकरणी सालेकसा तहसील कार्यालयातील पुरवठा निरीक्षक सतीश मदन डोंगरे यांच्या लेखी तक्रारीवरून सादर केलेला चौकशी अहवालावरून २४ डिसेंबर रोजी सालेकसा पोलिस स्टेशन येथे कलम ३१८ (४), ३१६ (२),३३६(३),३४० (२), ३(५) भान्यासं अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी पुढील तपास पोनि. बुराडे करीत आहेत.